# गुण गाईन आवडी

2 २८.१.९१

ॐ


प्रकाशक

विश्वस्त

परमपूज्य श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज व

परमपूज्य श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज स्मारक ट्रस्ट

श्रीवासुदेव निवास

कर्वे पथ, ४२/१७, एरंडवन, पुणे ४११ ००४.

# गुण गाईन आवडी

(परमपूज्य श्री दत्तमहाराज यांची प्रवचने व त्यांचेवरील लेख)

**संकल्पना**

नीलाताई जोशी

**संपादन**

डॉ. माधुरी पणशीकर
डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर

व्याख्यान 2 - पान 15
3 पान 19

**प्रकाशक**

विश्वस्त
श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज व
श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज स्मारक ट्रस्ट
श्रीवासुदेव निवास
कर्वे पथ, ४२/१७, एरंडवन, पुणे ४११ ००४.

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

प्रकाशन दिन

परमपूज्य श्री सद्गुरू गुळवणीमहाराज पुण्यतिथी
पौष वद्य आठ, रविवार दिनांक २६ जानेवारी १९९१.

किंमत १५/- रूपये

# मनोगत

प.पु.योगीराज वामनरावजी गुळवणी महाराजांची ही अठरावी पुण्यतिथी प.पु.दत्त महाराजांनी वामन निवास उभा करून प.पु. योगीराजांचे जणू स्मृतीमंदीरच उभे केले. वासुदेव निवासाची परंपरा सांभाळली जुने लोक सांभाळले नवा लोकसंग्रह केला. दोन देह पण मन मात्र एक, ध्येय एक, विचार धारा एक

*शिष्य आणि गुरुनाथु । या दोन्ही शब्दाचा अर्थु*
*श्री गुरुची परि होतु । दोहों ठाई ॥ ६१/२* अमृतानुभव

या प्रमाणे दोघेही एकाच गुरूरूपाने सर्वांचा सांभाळ करीत आहेत.

या पुण्यतिथीच्या महन्मंगल क्षणी काही भावरूप सेवा वासुदेव निवासाचे चरणी सादर करावी या हेतुने 'गुण गाईन आवडी' ही छोटी पुस्तिका प्रकाशित करावीशी इच्छा काही साधकांना निर्माण झाली व ती गुरूमहाराजांच्या आशिर्वादाने साकार होत आहे.

प.पु. दत्त महाराजांची प्रवचने यात गुंफली आहेत त्याचा लाभ सर्वांना व्हावा ही या सेवेमागे इच्छा आहे. अशीच अनेक विषयावर त्यांची प्रवचने झालेली आहेत ती ही अशीच पुस्तक रूपाने प्रकाशित व्हावी अशी परमेश्वर चरणी प्रार्थना आहे. वासुदेव निवास मधुन ती प्रकाशित करण्याची योजनाही असेल.

प.पु. श्री दत्त महाराजांची प्रवचनात आध्यात्मिक मार्गदर्शन तर असतेच पण व्यावहारिक बोधक असतो. कार्य, ज्ञान व भक्ति यांचा सुंदर त्रिवेणी संगम त्यांच्या प्रवचनांत पहायला मिळतो. ही प्रवचने वाचून आध्यात्मिक मार्गावर पुढे पावले टाकायला दिशा कळते व बळहि प्राप्त होते. म्हणून आध्यात्मिक मार्गावर वाटचाल करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाने ही प्रवचने पुन्हा पुन्हा वाचली पाहिजेत. प.पु. श्री महाराजांची प्रवचने, ही पुढील अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल असा अनमोल खजिना आहे.

या पुण्यतिथीच्या दिवशी योगीराज गुळवणी महाराजांना प्रिय होईल अशी सेवा म्हणजे प.पू. दत्त महाराजांच्या अमानित्वाने संपन्न अशा विभूतीमत्वाचा लाभ सर्वांना व्हावा हीच आहे. तो होईल याची मनाला खात्री वाटते. दैवीगुण संपत्तीने युक्त अशा त्यांच्या अंतरंगाचा ठाव आपल्या सामान्य मनाला होत नाही. हे त्यांचे व्यक्तित्व ज्यांच्या मनाला जाणवले त्यायोगे ज्यांच्या जीवनाला दिशा मिळाली अशा काही साधकांचे विचार शब्दरूपाने या पुस्तिकेत उमटलेले आहेत. ते वाचून अनेकांना प्रेरणा मिळेल असे ही वाटत आहे. अल्पस्वल्प सेवा आजच्या दिवशी निरपेक्षपणे सद्गुरू योगीराजांचे चरणी अर्पण करीत आहोत.

संपादक

# कृतज्ञता

परमपूज्य श्री सद्गुरू गुळवणीमहाराजांच्या अठराव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांचे परमशिष्य व उत्तराधिकारी परमपूज्य श्री दत्तमहाराज यांची कांही प्रवचने प्रकाशित करावी अशी इच्छा मनांत आली. परंतु मुख्य प्रश्न पुढे आला की त्यांची प्रवचने उपलब्ध कशी होणार. सुदैवाने परमपूज्य श्री दत्तमहाराजांचे एकनिष्ठ शिष्य श्री. गोपाळराव गोडसे यांनी श्रीमहाराजांची अनेक प्रवचने ध्वनिमुद्रित करून घेतली असून ती ध्वनिफितीवरून लिहून काढली आहेत व चक्रमुद्रित करून कांही प्रती श्रीमहाराजांच्या भक्तांना विनामूल्य उपलब्ध करून दिल्या आहेत हे लक्षांत येताच हा प्रश्न सुटला. श्री. गोपाळराव गोडसे यांनी गुरूसेवा करण्याच्या हेतूने आर्थिक झीज सोसून परिश्रमपूर्वक हे कार्य केले आहे हे विशेष. त्यांनी मोठ्या आनंदाने प्रवचनांची धारीका आमच्या स्वाधीन केली. त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत. त्यांनी दिलेल्या धारीकेतील तीन प्रवचने निवडून त्यावर संपादनाचे संस्कार केले. या प्रवचनांबरोबर श्री महाराजांचे व्यक्तिमत्व साकार करणारे लेखहि छापावे असे वाटते म्हणून तीन लेखांचा या पुस्तिकेत समावेश केला. इतरहि अनेक साधकांचे अभ्यासपूर्ण लेख मिळवता आले असते परंतु वेळे अभावी ते होऊ शकले नाही.

ही पुस्तिका प्रकाशित करण्यासाठी मुंबईतील अनेक साधकांनी आर्थिक सहाय्य दिलेले आहे याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो. त्यांची नांवे छापलेली त्या साधकांना आवडणार नाही म्हणून वैयक्तिक ऋणानिर्देश केलेला नाही. तथापि त्यांची सेवा श्री सद्गुरूचरणी रूजू झालेली आहे याचा उल्लेख करावासा वाटतो.

संपादक

# "श्री दत्त"

*सच्चिदानंदरूपाय विश्वोत्पत्यादिहेतवे ।*
*तापत्रय विनाशाय श्रीकृष्णाय वयं नमः ॥*

भारतवर्षामध्ये शंकराचार्य महाराजांचे नांव कोणाला माहित नाही असे नाही. परदेशात सुध्दा त्यांच्या ग्रंथाचा अभ्यास करणारे लोक आहेत. शंकराचार्य म्हणजे प्रत्यक्ष भगवान् शंकराचा अवतार. भगवान् गोपालकृष्णांनी जी भगवद्गीता सांगितली, ती महर्षी व्यासांनी महाभारतामध्ये लिहून ठेवली. त्याच भगवद्गीतेवर आचार्यांनी भाष्य केले आहे. उपनिषदांवरही त्यांनी भाष्य केले आहे. उपनिषदांचा अर्थ काय आहे, काय विषय मांडलेला आहे हे सगळं समजावून सांगितलेलं आहे.

उपनिषदे हा वेदांचाच भाग आहे. संपूर्ण वेदांमध्ये जीवमात्रांकरता काय काय मार्गदर्शन केले आहे, हे सांगणारा कोणी तरी लागतो. वेदांची भाषा, व्याकरण हे सगळं स्वतंत्र आहे. वैदिक सूत्रे निराळी आहेत. पाणिनीने वेदांच्याकरता वेगळी सूत्रे केली आहेत. शिवाय वेदवाक्यांचा अर्थ समजून घेण्याची योग्यता पाहिजे. शब्दांचे अर्थ वेगळे वेगळे केले जातात. बुध्दीमध्ये जसे जसे संस्कार असतील, त्या संस्कारांप्रमाणे त्या वाक्यांचा अर्थ वाटतो आपल्याला. म्हणून आपल्या भारतामध्ये शिक्षणाची गुरूपरंपरा प्राचीन काळापासून आहे. गुरूंनी ग्रंथांचा उपदेश आपल्या शिष्यांना करायचा. ज्ञान हे निष्कलंक, निर्दोष व्हायला पाहिजे, आणि तसं ते निर्दोष राहीलं पाहिजे. त्याकरता हा प्रयत्न आहे. ही परंपरा वेदांची आहे, शास्त्रांची आहे. वारकरी सांप्रदायामध्ये तर ती परंपरा आहेच आहे. ज्ञानेश्वरीच्या अभ्यास करणारी मंडळी, त्यांच्यापासून ऐकणारी मंडळी, त्यांच्यापुढे शिकणारी मंडळी, असं सगळं चालत आलेलं आहे.

वेदान्तशास्त्रामध्ये जे विषय आले आहेत ते मनोरंजनाकरता नाहीत. इथे मनाची स्थिरता करायची आहे. काय ग्राह्य आहे आणि काय अग्राह्य आहे हे मनाला समजलं पाहिजे. ह्या ग्राह्य अग्राह्याला हेयोपादेय विवेक म्हणतात. हेय म्हणजे घ्यायचे काय आणि उपादेय म्हणजे टाकायचे काय हे अगोदर समजलं पाहिजे. ते निश्चित ज्ञान झाल्यानंतर मग मन त्याप्रमाणे वागायला लागतं. कर्तव्य काय, अकर्तव्य काय, आत्मा कोण, अनात्मा कोण, नित्य काय, अनित्य काय, टिकणारे काय व विनाशी काय हा विवेक म्हणजे पृथक्करण हे मनानं करायचं आहे. पण हे मनाच्या पुढे मांडणारा कोणी तरी पाहिजे ना ! न टिकणारा पदार्थ टिकणारा आहे असं मनाला वाटतं. संसारभ्रम झालेला आहे असं संत, ज्ञानी, महात्मे सांगतात. आचार्यांचं तर हेच सागणं आहे. संसार हा भ्रम आहे. संपूर्ण भ्रम आहे. आभास आहे.

चांगदेवानी ज्ञानेश्वरांना पत्र म्हणून कोराच कागद पाठवला ही गोष्ट सगळ्यांना माहीत आहे. कोरा कागद पाहून मुक्ताबाईंनी स्पष्ट सांगितल, "चौदाशे वर्ष राहून हा अद्यापी कोराच राहिला." वास्तविक आयुष्य वाढवण्याकरता मनाचा निग्रह करण्याचा त्यांनी किती प्रयत्न केला असेल ! आणि त्याप्रमाणे फळही त्यांच्या पदरात पडलं. शंभर वर्षांचं आयुष्य शास्त्रीय प्रयत्नांनी वाढविता येतं. चौदाशे वर्ष चांगदेव राहिले ही काही नुसती कथा नाही. त्याचं शास्त्र आहे. रोज २४ तासात २१,६०० वेळा श्वासोच्छ्वास होतो. २१,६०० वेळा श्वास घेतला जातो आणि २१,६०० वेळा श्वास सोडला जातो. प्राणाचे हे कार्य चौवीस तास चालू असतं. झोपेमध्येही चालू असतं. टी.व्ही. चालू आहे म्हणून काही २४ तास कोणी टी.व्ही. पाहू शकत नाही. कंटाळा येईल पहाणाऱ्याला, दमून जाईल. कोणाचेही हात पाय वगैरे इंद्रिये २४ तास काम करू शकत नाही. श्रम होतात त्यांना दमणारी आहेत ती इंद्रिये. पण प्राणवायू मात्र २४ तास काम करतो. म्हणून उपनिषदांमध्ये प्राणवायूची उपासना करायला सांगितली आहे. दत्तात्रयांनी प्राणवायुला आपला गुरू मानलं आहे. २४ गुरूंपैकी एक. चौवीस तास त्यांचं काम चालू आहे आणि अपेक्षा काही नाही. प्राणाचा आणि शरीराचा संबंध म्हणजे जीवन आहे. जेव्हा प्राणाचा आणि शरीराचा संबंध तुटतो तेव्हा त्याला मृत्यु म्हणतात. प्राणवायू जाताना सगळ्या इंद्रियांची शक्ती घेऊन जातो. त्याच्याच मुळे सगळ्या इंद्रियांच्या क्रिया चालू असतात. क्रियाशक्ती जेवढी आहे ती प्राणाचीच आहे. तर श्वासोच्छ्वास हे प्राणवायूचे बाह्यरूप आहे.

प्राणायामाचा अभ्यास मात्र चांगल्या माहीतगार मनुष्याच्या मार्गदर्शनाप्रमाणे केला पाहिजे. त्याच्या देखरेखी खाली केला पाहिजे. नुसतं पुस्तक वाचून, नाक दाबून, तोंड दाबून धरणं आणि प्राणवायू कोंडून ठेवणं म्हणजे प्राणायाम नव्हे. शरीरामध्ये कितीतरी सूक्ष्म नाड्या आहेत. प्राणवायुचा आत बाहेर, त्या सगळ्यातून संचार चालू आहे. कुठे एखादे वेळेला तो कोंडून कस तरी भलत्या मार्गाने जाऊन जर त्याचा विरोध केला तर कुठेतरी जाऊन बसून वेड लागायची पाळी यायची. म्हणून योग्य मार्गदर्शन करणाऱ्यांच्या सानिध्यात राहून तो अभ्यास करायचा. श्वास आत घेणं आणि बाहेर सोडणं याला पूरक आणि रेचक म्हणतात. मध्ये काही वेळ प्राणवायू स्थिर करायचा असतो, त्याला कुंभक असं म्हणतात. प्राण स्थिर झाला की मनही स्थिर होतं. प्राणवायू जर थोडा वेळ स्थिर झाला तरी मनात विचार येण बंद होतं. म्हणून या मार्गाने जाणारे काही लोक आहेत. योगमार्ग म्हणजे प्राणशक्तीचा विकास करणं. प्राण स्थिर करणं. प्राण स्थिर झाला की मन स्थिर होतं. पण सर्वांसाठी हा मार्ग नाही. सगळीच औषध काही सगळ्याच रोग्यांना लागू पडत नाहीत. तसं प्राणवायुला स्थिर करून मनाला स्थिर करण्याचा प्रयत्न हा एक मार्ग सांगतात. चांगल कुठं तरी एका ठिकाणी मन स्थिर रहाणं हा सुध्दा अभ्यास आहे. प्राणवायु स्थिर झाला तर मन

स्थिर होतं. तर अशी ही प्राणाची शक्ती आहे. शरीरात प्राणवायू असेपर्यंत शरीर चांगल्या अवस्थेत राहू शकतं. कुंभक फक्त झाला, प्राण स्थिर झाला, श्वास प्रश्वास बंद झाले, अशा रीतीने प्राणवायू जर स्थिर झाला तर २१,६०० या संख्येत कितीतरी घट होईल. श्वासोच्छ्वासाच्या या संख्येवर तर शास्त्रकारांनी आयुष्याची मर्यादा किंवा कोष्टक बसवलं आहे. तर प्राणायामाचा अभ्यास झाला, प्राणवायू निग्रहीत झाला, योग्य मार्गदर्शनाने जर कुंभक स्थिर झाला तर श्वासोच्छ्वास कमी होतात आणि तितकं आयुष्य वाढतं. असा अभ्यास केलेले चांगदेव होते. त्यामुळे चौदा वेळ त्यांनी मृत्यू चुकवला. ही काही नुसती ऐकायची गोष्ट नाही. तो अभ्यास आहे. त्याचं शास्त्र आहे आणि त्याकरता मार्गदर्शन करणारे महात्मे आहेत.

परंतु प्राण स्थिर झाला तरी मन स्थिर नाही. मनाला शांती नाही. ती शांती मिळवण्याकरता ज्ञानाचा उपयोग आहे. ज्ञान मनाने करून घ्यायचे. मी कोण आहे ? मी मोठा योगी आहे. इथपर्यंत आले आहेत चांगदेव आणि योगी असल्यामुळे सर्व सिध्दी त्यांच्यापाशी आहेत. सिध्दी म्हणजे मानसिक शक्तीचा विकास. तर या सिध्दी मिळून सुध्दा त्यांच्या मनाला शांती नाही. त्याकरता ज्ञान मिळालं पाहिजे. पण आत्मज्ञान हे स्वतंत्र आहे. योगाचा उपयोग त्याकरता होत नाही असे नाही. मन स्थिर होत. कुंभक म्हणजे प्राण स्थिर झाल्यावर बाहेरचे सगळे व्यवहार बंद झाले. मन स्थिर झाल्यावर, मनामध्ये नवीन विकार उत्पन्न होणं आणि आधीच्या विकारात भर पडणं हे बंद होतं. आणखी जे जे काही जुने संस्कार मनावर असतील ते प्राणायामाने कमी कमी होत येतात. असा दुरितक्षय होतो.

तर ते कोर पत्र आल्यावर ज्ञानेश्वर महाराजांना निवृत्तीनाथांनी उत्तर लिहून पाठवायची आज्ञा केली. सद्गुरूरूपी पूर्ण शक्तीची जी आज्ञा होईल त्याप्रमाणे वागायचं ही ज्ञानेश्वरांची भूमिका आहे. त्यामुळे कोणच्याही प्रकारचा संदेह त्यांच्या मनात नाही. पण चांगदेवांना तो संदेह आहे. खरं म्हणजे चांगदेव समाधीतून उठल्यावर आपल्या योगसामर्थ्याने मृत व्यक्तींना जिवंत करीत अशी त्यांची कीर्ती होती. पण मनाची स्थिरता नव्हती. मनाची स्थिरता ही प्राणाच्या स्थिरतेवर अवलंबून असली तरी ती स्वाभाविक स्थिरता आहे. मनाचं स्वाभाविक स्वरूप उपनिषदांमध्ये सांगितलेलं आहे. मन हे काय तत्व आहे, कशापासून मन उत्पन्न होतं, त्याच कार्य असतं, त्याच्यामध्ये काय काय घटक पदार्थ आहेत हे सगळं कळल्यानंतर मग त्याच्यात कशी काय सुधारणा करायची इकडे लक्ष देता येईल.

पंचमहाभूतांपासून सर्व सृष्टी झाली. पंच महाभूतांमध्ये सुध्दा सत्व, रज आणि तम हे तीन विभाग आहेत. ज्ञानेंद्रिय ही पंचमहाभूतांच्या सत्वांशापासून,

क्रियाशक्तिमान असलेली कर्मेंद्रिये ही रजोगुणांशापासून आणि सगळ्या पंचमहाभूतांच्या सत्वांशापासून मन तयार झाले आहे. ईश्वराच्या ह्या सृष्टीत हे मूळ तयार झालेलं मन सत्वशील आहे. 'मना सज्जना भक्तिपंथेची जावे' समर्थांनी मनाला सज्जना म्हणून संबोधित केले आहे. 'तू सज्जन आहेस, बाबा मूळ तुझी उत्पत्ती चांगली आहे. पण आता त्याच्यामध्ये रजोगुण, तमोगुण मिसळून तुझं स्वरूप बदललेलं आहे. क्रियाशक्ती हे रजोगुणाचं कार्य आहे. कामक्रोधादि विकार हे रजोगुणाचं स्वरूप आहे. झोप, आळस वगैरे हे सगळे तमोगुणाचे विकार आहेत. मनातले रजोगुण, तमोगुण कमी करून मनाला मूळचं स्वरूप द्यायचंय त्यामुळे मनाची चंचलता कमी होईल.

पण ते मन स्थिर करू शकले नाहीत चांगदेव. मनाला शांती मिळाली नाही. समाधान मिळालं नाही. ज्ञान झालं नाही. तेव्हा आत्मज्ञान करून घेण्यासाठी ज्ञानदेवांना शरण आलेले आहेत. पत्र लिहीताना मनात गोंधळ निर्माण झाला. नमस्कार लिहावा तर ज्ञानेश्वरांचं वय २०-२२ वर्षांचं. पण गुरू आहेत. त्यांच्यापासून ज्ञान मिळवायचंय. शांती मिळवायची आहे. मग त्यांना आशिर्वाद कसा लिहिणार ? म्हणजे ज्ञानेश्वरांना लहान म्हणावं की मोठ म्हणावं याच्यातच गोंधळ निर्माण झाला. श्रेष्ठ कनिष्ठ हा भेद शरीराच्या दृष्टीने केला जातो. आत्माच्या दृष्टीने नाही. म्हणजे चांगदेव अद्यापि शरीराचा विचार करण्यापर्यंतच आलेले आहेत. त्यामुळळे त्यांच्या मनाला काही निर्णय करता आला नाही. विवेक झाला नाही. तसाच कोरा कागद पाठवून दिला.

पण ज्ञानेश्वर महाराजांनी गुरूंची आज्ञा झाल्याबरोबर लिहायला सुरूवात केली. आशिर्वाद लिहावा की नमस्कार लिहावा हा गोंधळ नाही. सगळा विवेक झालेला आहे. व्यवहार कसा करायचा, परमार्थ कसा करायचा हे सगळं त्या मनाला समजून आलेलं आहे. म्हणून आहे ज्ञानेश्वर महाराजांची चांगदेव पासष्टी.

स्वस्तिश्री वटेषु । जो लपोनी जगदाभासु ।

दावोनी मग ग्रासु । प्रकटला जगी ॥१॥

ज्ञानेश्वर महाराजांना आत्मदृष्टी आहे. सर्वत्र एक ब्रह्मतत्व भरून राहिलेलं आहे. त्या ब्रह्माशिवाय दुसरे काही नाही. सर्वत्र एक वासुदेव आहे. बाह्य स्वरूपही सर्व एक वासुदेव अशी वृत्ती झाली. त्या दृष्टीने ज्ञानेश्वर लिहायला सुरूवात करताहेत. "स्वस्तिश्री वटेषु" वटेष्वर हे चांगदेवांचे नांव. वटेश्वर चांगदेवांचे स्वस्ति असो. व्यवहार दृष्टीने तुम्ही आम्हाला लहान समजत असलात तरी सुध्दा लहान मनुष्याने मोठ्या मनुष्याचे कल्याण व्हावे असे म्हणायला हरकत नाही.

म्हणून "स्वस्ति" प्रयोग केलेला आहे. स्वस्तिश्री वटेषु पण वटेश्वर चांगदेव म्हणून कोण समजताहेत ज्ञानेश्वर महाराज-

*जो लपोनी जगदाभासु*
*दावि प्रकटीला जरी ।*

चांगदेव म्हणजे आत्मरूप आहे. सर्व विश्वरूपी झालेला जो परमात्मा आहे तोच चांगदेव आहे. तो जर लपून आच्छादित झाला तर 'जगदाभासु दावि' सबंध जग दिसायला लागेल आणि जर प्रगट झाला तर चांगदेव सबंध विश्वाला ग्रासेल. या एका ओवीतच चांगदेवांना विश्वरूप करून टाकलं. हे सगळं शंकराचार्य महाराजांनीही समजावून सांगितलं आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी उपनिषदांचा सिध्दान्त या एका ओवीत सांगितला आहे आणि तो असा की आत्मरूपी परमात्मा आवृत्त आहे. आत्मा आनंदरूप आहे. आत्मरूप स्वतः आनंदस्वरूप असताना जीवाची बाहेर आनंद शोधायची किती धडपड चालली आहे. वैयक्तिक प्रयत्न काय, सामुदायिक प्रयत्न काय, सगळं चाललेल आहे. सुखाचा शोध चाललेला आहे.

पण पूर्ण सुख बाहेर आहे का आत आहे याचा शोध केला पाहिजे. विवेक संपन्न बुध्दी ज्या महात्म्यांची आहे त्यांच्या बुध्दीने सगळे पृथक्करण केलेलं आहे. काय घ्यायचं, काय सोडायचं हे त्यांच्या मनाला/बुध्दीला पक्के समजलेले आहे. अनित्य, विनाशी आनंद नको आहे. संसारामध्ये सुख नाही असं म्हणत नाही. परंतु ते सुख, तो आनंदसुध्दा आत्मानंद आहे असा सिद्धान्त आहे वेदांचा. आपल्याला दहा हजार रूपये मिळाले की होणारा आनंद, धनाने, कीर्तीने मिळाला असे आपण समजतो. पण मन स्थिर झाल्यावर तोच आत्मानंद बाहेरून मिळतो. पूर्व सुकृत असल्याशिवाय ह्या आनंदाकडे, ईश्वरप्राप्तीच्या मार्गाकडे तो जाऊ शकत नाही.

तुलसीदासांची गोष्ट प्रसिध्दच आहे. पत्नी माहेरी गेल्यावर तिच्या आसक्तीने, तिच्या माहेरी जाताना नदीतल्या प्रेताला ओंडका समजून आणि मग घराच्या खिडकीतल्या सापाला दोरी समजून ते पत्नीकडे पोहोचले. पण त्यांच्या पत्नीला वाईट वाटून त्या म्हणाल्या, "ह्या शरीरावर एवढं प्रेम, आसक्ती जडली आहे तुमची ! पण शरीराच्या आतल्या आत्मारामावर तुमचं मन गेलं तर उध्दार होईल तुमचा". त्या क्षणी तुलसीदासांच्या ठिकाणी वैराग्य उत्पन्न झालं. त्यांनी पत्नीला गुरू मानलं. त्याला बहुत सुकृतांची जोडी हे म्हणायलाच पाहिजे.

चांगलं कर्तव्यकर्म केलं असेल तर ते असं एकदम उपयोगी पडतं. तत्कालिक जरी अनुभव आला नाही तरी ते जमा आहे. ते जमा करणारी ईश्वरशक्ती वेगळी आहे. तुलसीदासजींची चित्तवृत्ती इतकी बदलून गेली की ते संसारातून बाहेर पडले. मारूतीरायांची भेट झाली. रामरायांचं दर्शन झालं. सगळं झालं तुलसीरामायण तयार झालेलं आहे. परमात्म्याचा साक्षात्कार झालेला आहे.

हो जो स्वरूपानंद अविनाशी आहे तो सहजसिध्द आनंद आहे. त्या आनंदापर्यंत पोहोजलेला जीवात्मा आनंदरूप होऊन गेला. त्याचा जीव भाव नाहीसा झाला. हे वेदांनी मार्गदर्शन केलेलं आहे. शेवटची भूमिकां काय आहे हे सांगितलेलं आहे. त्या भूमिके पर्यंत जाण्याची सर्व साधनेही सांगितली आहेत. ऋषी मंडळींनी ती निवडून वेगवेगळी स्वतंत्र शास्त्र केली आहेत.

त्यापैकी योगशास्त्र एक आहे. स्वतःच आत्मस्वरूप समजावून घेण्याकरता त्याचा उपयोग करून घ्यायचा आहे. त्याचा अभ्यास करण्याकरता शरीराची आसक्ती कमी झाली पाहिजे. पहिले नियंत्रण आहारावर आहे. "आहारशुध्दी सत्वशुध्दी" असं त्याचं सूत्र आहे. आहार शुध्द असेल तर मनाची शुध्दी होते. मनाची शुध्दी होते याचा अर्थ मनाला स्थिरता येते. सत्वगुण वाढतात. रजोगुण, तमोगुण कमी होतात. सत्वगुण वाढले की मनाची स्थिरता येते. मनाची स्थिरता वाढल्यानंतर विवेक पक्का होतो. विवेक पक्का झाल्यावर ग्राह्य अग्राह्य कोणतं हे समजतं. एकदा टाकून दिलं की मन परत तिकडे जायचं नाही ही वैराग्याची सीमा आहे.

वैराग्याची खरी भूमिका मिळवण्यासाठी मनाचं परीक्षण करण्यातच पुष्कळ वेळ जातो. मनाची शुध्दी म्हणजेच स्थिरता मिळवण्याकरता संयम आवश्यक आहे. शास्त्रकारांनी मुद्दाम सांगितलंय की संयम हा पुरूषांपेक्षा स्त्रियांच्या बुध्दीमध्ये अधिक आहे. म्हणून स्मृतीकारांनी स्त्रियांवरती स्वयंपाक करण्याची जबाबदारी याकरता दिली आहे. रसनेंद्रियाला जो आवडेल तो आहार घेऊन चालणार नाही. सात्विक आहाराने मन सात्विक बनते. आहारातल्या शुध्दांशापासून मन तयार होतं. पावित्र्य, शुचिता ही स्त्रियांनी अधिकाधिक सांभाळली पाहिजे. शरीराची पवित्रता, वाणीची पवित्रता ही सगळी शुचिता सांभाळण्याची जबाबदारी मनुने स्त्रियांवर टाकली आहे. तसेच स्त्रियांनी धर्मकार्याचा अभ्यास केला पाहिजे. वैयक्तिक धर्म कोणचा, सामाजिक धर्म कोणचा याचा त्यांनी अभ्यास केला पाहिजे. गृहिणी हीच 'घर' म्हणून मनुने म्हटले आहे. गृहस्थाला 'घर' म्हटलेले नाही. मनु हा मोठा समाजशास्त्रज्ञ आहे. समाजवादाचा पुरस्कार करणाऱ्यांनी मनुस्मृतीचा अभ्यास केला पाहिजे.

'अन्नमय मनः' असं उपनिषदांमध्ये सांगितलं आहे. मन हे अन्नमय आहे. पती, मुलं आणि इतर आप्तेष्ट मंडळींसाठी त्या गृहीणीने प्रेमाने अन्न तयार करायचं आणि त्या अन्नापासून त्या सर्वांचं मन तयार होतं. म्हणजे घरात रहाणाऱ्या किंवा समुदायामध्ये रहाणाऱ्या सगळयांच्या मनाची शुध्दी करण्याची जबाबदारी स्वयंपाकाच्या निमित्ताने मनुने स्त्रियांवर सोपवली आहे. स्त्रियांना स्वयंपाक करण्याकरता ठेवलं आणि पुरूषांना वाटेल तशी मोकळीक दिली असा त्याचा अर्थ नाही. ज्ञानी माणसांच्या संगतीत राहून ह्या संदर्भात पुष्कळ ज्ञान

मिळतं. प्रत्यक्ष कृतिपर्यवसायी ज्ञान मिळळतं. त्यामुळे स्त्रियांची काय किंवा पुरूषांची काय, बुध्दी विवेकसंपन्न होते.

आचार्य महाराजांनी याप्रमाणे सगळे ग्रंथ केले, सर्वत्र संचार केला, सगळयांना ते ज्ञान समजावून सांगितले. धर्मविरोधी बुध्दीचे जे लोक होते त्यांच्या बुध्दीची, वादविवाद करून, त्यांचा पराजय करून, त्यांना खरं ज्ञान देऊन, सुधारणा केली. मनष्याची बुध्दी ही स्वभावतः पक्षपाती नाही. ज्यावेळी रागद्वेषादिक दोष शिरतात तेव्हा ती पक्षपाती होते. आचार्यांची शिकवण पुष्कळांना पटली. पण रागद्वेषादि दोषांनी भरलेल्या त्यावेळच्या काही व्यक्तींना वाटले की आचार्यांना जिवंत ठेवून उपयोगी नाही.

त्यांच्या चरित्रात त्याबद्दल एक कथा आहे. उग्रभैरव नावाचा भैरवाची उपासना करणारा, बलिदान वगैरे तंत्रमार्गाने जाणारा एक मांत्रिक होता. आचार्यांनी त्याला त्याचा मार्ग बरोबर नाही, शास्त्रीय नाही, शुध्द मार्ग नाही असे सांगितले. पण ते त्याला पटले नाही. एक दिवस तो आचार्यमहाराजांना भेटायला आला आणि आपल्या यज्ञाकरता सर्वज्ञ मनुष्याचे म्हणजे आचार्यांचे मस्तक मागितले. त्याला वाटले आचार्यांचा नाश केला म्हणजे ज्ञान संपलं. परंपरेने येत असलेले ज्ञान भारतात असल्यामुळे एकाच व्यक्तीचा नाश केला किंवा एखादा ग्रंथ जाळून टाकला म्हणजे ज्ञान संपलं ही अगदी स्थूल कल्पना आहे. स्थूल बुध्दी आहे. भैरवाची बुध्दी अशी स्थूल होती, विचारी नव्हती. पण आचार्यांना शरीराची आसक्ती नव्हती. जे आत्मानंदात मग्न आहेत, आत्मसमाधीत रहाणारे आहेत त्यांना शरीराची काय पर्वा ! त्यांनी भैरवाला सांगितले की, "उद्या मी एका गुहेत एकटाच बसतो. तिथे शिष्य वगैरे कोणी नाही. तुम्ही या आणि तुम्हांला हवं असलेलं माझं मस्तक घेऊन जा."

आचार्यांचे पट्टशिष्य पद्मपादाचार्य हे नरसिंहाचे उपासक होते. सद्गुरू बद्दल दृढ श्रध्दा व त्यांची सेवा घडावी ही तीव्र इच्छा त्यांच्या मनात होती. गुरूभक्ति आहे शिवाय नरसिंह भक्तीही आहे. पण नरसिंह व गुरू वेगळे नाहीत. वेगळेपणा कुठे करायचा आणि कुठे करायचा नाही. हे सुध्दा मनाला समजलं पाहिजे. विवेक म्हणजे पृथक्करण ते मनानेच करायचं. तसं इथे ईश्वर वेगळा आहे, गुरू वेगळा आहे हे पृथक्करण नाही आहे. इथे मात्र एकच शक्ती आहे. ईश्वरशक्ति आणि गुरूशक्ती एक आहे. माझ्या ठिकाणी असलेली शक्तीसुध्दा तीच आहे. माझी शक्ती स्वतंत्र नाही. इथे पृथक्करण उपयोगी नाही. पूर्ण अव्दैत पाहिजे. अशी पद्मचार्यांची दृष्टी आहे. नरसिंहाची उपासना अशी सिध्द झाली आहे. त्यांची उपास्य देवता स्वरूप होणं हे उपासनेचे शेवटचे साध्य आहे. याचे एक छान उदाहरण आहे. पूर्वी बीड जिल्ह्यात भृशुंडी ऋषी होऊन गेले. ते पूर्वायुष्यात वाल्या कोळ्यासारखे वाटसुरूंना लुबाडायचे, मारायचे. एकदा त्यांना

मुद्गल ऋषींनी मंत्रोपदेश केला. भृशुंडी ऋषी ज्यांचे पहिले नांव नामा होते, त्यांनी गणपतीची इतकी उपासना, जप केला की भृमध्यातून त्यांच्या सोंड उत्पन्न झाली. शुंड म्हणजे सोंड. म्हणून भृशुंडी नांव त्यांना पडलं. म्हणजे उपास्य देवतारूपच ते होऊन गेले. "आशापूर्त गणेश" म्हणतात त्या गणेशाला पुष्कळ लोक जातात. तिथे यात्रा वगैरे भरते.

तर पद्मपादाचार्य पूजा आटोपून नरसिंहाचे ध्यान करीत बसले आहेत आणि समाधी अवस्थेत, गुरूमहाराजांना कालचा मांत्रिक तलवार घेऊन मारायला आला आहे असे दृश्य दिसले. एकदम ध्यानावस्थेमध्ये त्यांनी नरसिंहरूप धारण केले आणि तो मांत्रिक गुरूमहाराजांजवळ जाण्यापूर्वी धरले. खाली पाडले, त्याचे पोट फाडले आणि त्याचा नाश केला. आचार्यांची समाधी उतरली. समोर पहातात तो नरसिंह. आचार्यांनी त्यांची स्तुती वगैरे केली. बऱ्याच काळानंतर पद्मपादाचार्यांची समाधी अवस्था संपली, ते नरसिंहाचे रूप अदृश्य झाले आणि पुनः पद्मपादाचार्य दिसू लागले. जागृतावस्थेत आल्यावर त्यांनी गुरूमहाराजांना नमस्कार केला.

पद्मपादाचार्य संन्यासी आहेत. तुळशीसुध्दा तोडायच्या नाहीत. फुलं तोडायची नाहीत. काही नाही. नुसतं पाणी घालून पूजा करायची. इतकी अहिंसा ज्यांनी पाळायची त्यांनी या भैरवाला ठार मारले आणि आपल्या गुरूमहाराजांचे रक्षण केले. म्हणजे गुरूमहाराजांचे संरक्षण हे आपले पहिले कर्तव्य आहे. गुरू आणि ईश्वर एकच आहे. ही घटना ईश्वराच्या इच्छेने झाली आहे. आणि पद्मपादाचार्यांनी त्याला नरसिंह रूपाने मारले आहे. संन्यासी रूपाने नाही. गुरूमहाराज आमचे आहेत, ही ममता पाहिजे.

*गुरूदेव एक मानूनी भक्ति ।*
*तयाची करि त्या करी येई मुक्ति ।*
*सुयुक्ति अशी ही धरी नित्य चित्ता ।*
*त्वरे आदरे तूं स्मरे नित्य दत्ता ॥*

चित्तसद्बोध नक्षत्रमालेमध्ये सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी एक मार्ग सांगितला आहे. कुठे विवेक पाहिजे, कुठे अविवेक पाहिजे. याचा तो आधीच्या गोष्टीप्रमाणेच आहे.

संतांच्या संकल्पाची शक्ती फार मोठी आहे. पण अलीकडे विज्ञानाची शक्ती मोठी आहे, विज्ञानवाद मोठा आहे, असे लोकांना वाटते. पण त्याचे कारण बुध्दीमध्ये विवेक राहिला नाही. गुलाबराव महाराजांनी एकदा एका फोटोग्राफरला फोटो काढू नका म्हणून सांगितले. त्याने तरीही एक ग्रुप फोटो महाराजांच्या नकळत काढला. पण दुसऱ्या दिवशी त्या फोटोत इतर सर्वांचे फोटो आले आणि गुलाबराव महाराजांचा फोटो आला नाही. अशी त्यांची शक्ती आहे.

संतांचे ग्रंथ नि:पक्षपाती आहेत. निर्भय आहेत ते. असं झालं तर असं होईल असं सांगताहेत. आचार्य महाराजांनी हे सगळं सांगून ठेवलेले आहे. कर्ममार्ग कसा असावा, भक्तिमार्ग कसा असावा वगैरे सगळं मार्गदर्शन त्यांनी केलेले आहे. ज्ञानेश्वर महाराजसुध्दा म्हणतात - भाष्यकाराला वाट पुसतो. त्यांनी ही शास्त्र काय सांगते तेच सांगितले आहे. त्यांचेच सिध्दान्त ह्यांनी सांगितलेत. आचार्य महाराजसुध्दा सांगतात - वेदामधले सिध्दान्तच मी मांडले आहेत. ईश्वर श्रेष्ठ आहे. सर्वोच्च आहे. पूर्णज्ञानी आहे आणि आपले ज्ञान अगदी अल्प आहे. श्रेष्ठ पुरूष हे भारताचे केवढे वैभव आहे. त्यांनी बुध्दी विकास पुष्कळ केलेला आहे. तो बुध्दी विकास होण्याकरता प्रयत्न झाला पाहिजे. भौतिक विकास पुष्कळ झाला तरी भारताचा तो खरा विकास म्हणता येणार नाही. ज्यांनी मनोविकास करून घेतला त्या शास्त्रज्ञांचं असं सांगणं आहे की सर्वांच्या बुध्दीचा विकास झाला पाहिजे. तो होण्याकरता

*दुरितांचे तिमिर जावो ।*
*विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।*
*जो जो वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।*

असे ज्ञानेश्वर महाराजांनी देवाजवळ मागणं मागितलंय. पसायदान म्हणजे बुध्दी विकास कसा आहे ह्याच रूप आहे. सर्वांच्या बुध्दीला प्रेरणा करणारी ईश्वरशक्ती अबाधित आहे. तो समजून घ्यायचा आणि आपल्या वैयक्तिक जीवनामध्ये आणण्याचा प्रयत्न करायचा. त्या ईश्वरशक्तीकडून सगळे कार्य चाललेले आहे. त्या ईश्वराबद्दल आणि भक्तीमार्गाचे मार्गदर्शन करणाऱ्या महात्म्यांबद्दल विश्वास ठेवून जर आपण चाललो तर आपल्यालाही तो मार्ग हस्तगत व्हायला हरकत नाही. तो मार्ग आपल्याला मिळावा अशी रोज प्रार्थना करायची देवाजवळ ती प्रार्थना केव्हांतरी रूजु झाल्याशिवाय रहाणार नाही आणि आपली बुध्दी शुध्द होईल. 'बुध्दि दे रघुनायका' एवढंच मागायचंय.

*॥ अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त ॥*

# ॥ श्रीगुरूदेव दत्त ॥

*उपासनेला दृढ चालवावे । भूदेव संतासी सदा नमावे ।*
*सत्कर्म योगे वय घालवावे । सर्वां मुखी मंगल बोलवावे ॥*

समर्थांनी हा उपदेश केलेला आहे. मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानंतर काय करावे हे आपल्याला कळत नाही. संतांची बुध्दी ही निश्चित बुध्दी आहे. आपली बुध्दी अनिश्चित आहे. चंचल आहे. त्यामुळे एका वेळेला एक करावेसे वाटते. नंतर ते नको वाटते. दुसरेच काही करावेसे वाटते. पण संतांनी आपल्या निश्चित बुध्दीने जे काही कल्याण्याचे साधन सांगून ठेवलेले आहे त्याचा आपण विचार करायचा आणि त्याप्रमाणे आचरण करण्याचा प्रयत्न करायचा.

ईश्वराची उपासना करावी हे सर्व संत सांगतात. तोच पहिला उपदेश आहे. "उपासनेला दृढ चालवावे" हा सर्वसाधारण सर्वांना उद्देशून उपदेश आहे. अमुकच एकाला आहे असे नाही. स्त्री असो, पुरूष असो, बाल असो, वृध्द असो, सर्वांना सर्वसामान्यांना हा उपदेश आहे.

ईश्वराची उपासना करावी आणि ती चालू ठेवावी. नित्यकर्म म्हणतात याला. ईश्वराची उपासना, भक्ति ही नित्यकर्मे आहेत. रोज काही तरी शरीराने, वाणीने, मनाने अशा प्रकारची उपासना ही नित्य चालवावी असे म्हणतात. आणि ती दृढ असावी. मधे मधे करणे, मधे मधे सोडणे असे होऊ नये. धरसोड वृत्ती म्हणतात त्याला. उपासना न थांबता चालू असावी. असा पहिला उपदेश आहे.

आणि ही ईश्वराची उपासना झाल्यानंतर "भूदेव संतांसी सदा नमावे" महात्मे हेच भूदेव आहेत. स्वर्गामध्ये रहाणारे देव आपल्या पुण्यकर्माने स्वर्गात गेलेले असतात. पण त्या ठिकाणी काही उपासना वगैरे संबंध नाही. पुंण्याने अनुकूल परिस्थिती मिळालेली असते. जास्तीत जास्त अनुकूल परिस्थिती मिळाल्यानंतर ईश्वराचे स्मरण रहाणे कठीण आहे. अनुक्रमे विषय वासना मनामध्ये उत्पन्न होतात. म्हणून "भूदेव संतांसी सदा नमावे" हे मुद्दाम सांगतात. संत हे भूदेव आहेत. भूमीवर असणारे देव आहेत. त्यांच्याबरोबर रहावे, त्यांची संगती घडावी, नम्रपणे वागावे, त्यांच्यापासून काही आणखी मार्गदर्शन मिळवावे हा दुसरा उपदेश आहे.

ईश्वराची उपासना ही प्रथम आहे आणि त्या ईश्वराच्या कृपेने संत आहेत, जे मार्गदर्शक, सद्गुरू आहेत त्यांची भेट होते. आणि ती भेट झाल्यानंतर हे संत आहेत, ह्यांच्यापासून आपल्याला काही तरी फायदा होईल अशी श्रध्दा, विश्वास मनामध्ये होतो. त्यांची संगती करणे हे विशेष आहे. पण संताची संगती घडणे आणि त्यांच्यापासून मार्गदर्शन मिळणे हे कठीण आहे. म्हणून ईश्वराची उपासना त्यांनी अगोदर सांगितलेली आहे. ती चालू ठेवायची.

संसारामध्ये जे मन गुंतून राहिलेले असते ते काढून घ्यायचे आहे आपल्याला! तेच कठीण आहे. संसार सोडायचा असा त्याचा अर्थ नाही. संसारामध्ये आपले मन आसक्त झाले आहे ते अनासक्त होणे महत्वाचे आहे. परमार्थ हा सगळा मनाच्याच प्राधान्याने होतो. व्यवहारातसुध्दा मनाची योग्यता ही लागतेच. ती योग्यता असल्याशिवाय व्यवहारात तरी आपले कार्य कसे यशस्वी होईल ? पारमार्थिक दृष्टीने मन तयार करणे, शुध्द करणे याची आवश्यकता सांगितलेली आहे. मनामध्ये काय दोष आहेत, ते अगोदर कळले पाहिजे. ते कळले तर ते मान्य झाले पाहिजेत. आम्हाला ते मान्य होत नाहीत. अहंकारामुळे जरी आपल्या हातून काही चुका झाल्या तरी आम्ही कधीही चुकत नाही असेच समजतो. 'आमच्या हातून चुक कधीही होत नाही' असेच लोकांना सांगतो. झालेल्या असतात पुष्कळ चुका ! वैयक्तिक, सामुदायिक पुष्कळ नुकसान झालेले असते. पण ते दोष मान्य होत नाहीत आपल्याला हा दोष आहे, असे वाटल्यानंतर तो घालवायला पाहिजे. कसा घालवता येईल ? कोण याचा उपाय सांगेल ? ही एकंदर विचारसरणी असली पाहिजे.

मनामध्ये असणारे हे दोष दूर करण्याकरीता ही संतसंगती पारमार्थिक दृष्टीने अत्यंत श्रेष्ठ सांगितली आहे. दोष ज्ञान करून देणारेही तेच असतात. आपल्यात कोणते दोष आहेत तेही ते सांगतात. कारण त्यांनी आपले स्वतःचे दोष घालविलेले असतात ना ! त्यांच्याजवळ कोणतेही दोष नाहीत. त्यांच मन शांत आहे. क्षमाशील आहे. कोणते दोष कसे घालविता येतील याची सगळी माहिती त्यांना आहे. त्यांच्याजवळ ज्ञान आहे आणि शक्तिही आहे. मनातले दोष ज्यांनी दूर केलेले आहेत, ज्यांचे मन शांत एकाग्र झालेले आहे त्यांना सगळ्या सिध्दी मिळतात, असे योगशास्त्रकार सांगतात.

सिध्दी म्हणजे मानसिक शक्तिचा विकास आहे. आमच्या मनाची शक्ती जी संकुचित झाली आहे, त्या शक्तीचा विकास म्हणजे सिध्दी ! समुद्राच्या पलिकडे लंकेत जायचे ठरले. वानर मंडळींना समजले. त्या जटायूच्या बंधूने सांगितले, समोर लंका दिसते आहे मला, त्यांच्यामध्ये सीता बसलेली आहे. तिच्या सभोवती राक्षसींचा पहारा आहे. ते समजले खरे, पण तिथे जायचे कोणी ? संपातीने पाहून सांगितले तिथे सीता आहे. त्याना पाहून सांगितले म्हणजे काय शोध लावण्याचे काम झाले असे नाही. इतर वानरांचे सामर्थ्य कमी होते. परंतु शेवटी मात्र सर्वांनी मारूतीरायांचीच योजना केली. त्यांची शक्ती मोठी आहे असे मान्य केले. सर्वांना मान्य झालेली ही शक्ती मारूतीरायांना मिळाली कशी ?

शंभर योजने म्हणजे चारशे कोस. सबंध पाणी. त्या पाण्यावरून जायचे आहे. देवांना विमाने असतील. त्यावेळेला पुष्पक विमाने होती. सगळे काही वर्णन रामायणामध्ये आहे. पण ह्या वेळेला मारूतीरायांना कुठले विमान मिळणार ? ते

आपल्याच सामर्थ्याने जाणार आहेत. मनामध्ये, शरीरामध्ये सामर्थ्य आहे ! रावणाच्या राजधानीत जाऊन परत यायचे आहे. हे सामर्थ्य दुसऱ्या कोणाकडे नाही. काय करतील ते राक्षस याचा नेम नाही. शत्रुचा हेर सापडल्यावर कोण त्याला दया दाखविणार ? पण मानसिक शक्तीच्या बळावर त्यांनी कार्य केले. काम करायच्या आधीच शंकाकुशंका मनात आल्यातर त्याच्याकडून काम काही व्हायचे नाही. व्यवहारात होणार नाही आणि पारमार्थिक दृष्टीने होणार नाही.

स्वामींचे कार्य करायचे ही एक बुध्दी आहे. रामचंद्र हे आपले स्वामी आहेत आणि त्यांची पत्नी रावणाने म्हणजे राक्षसाने पळवून नेलेली आहे. त्यामुळेही मन अतिशय प्रक्षुब्ध झालेले आहे. त्याला शासन केले पाहिजे ही मनाची तयारी आहे. 'बुध्दीमतां वरिष्ठम्' एकाच शब्दात सांगितले आहे की, त्या बुध्दीला असाध्य असे काही वाटतच नाही. रामांचाही मोठा विश्वास त्यांच्यावर होता. सगळी वानर मंडळी निघाली, तरी मारूतीरायांना ह्यांनी बोलावले आणि आपल्या बोटातील अंगठी काढून मारूतीरायांच्या जवळ दिली. ही सीतेला दाखव म्हणून सांगितले म्हणजे हाच काम करणारा हे त्यांनी ओळखले.

परमेश्वराने त्याच्याकडून सत्कर्म करवून घेतले. 'सत्कर्म योगे वय घालवावे' हे एक महत्वाचे सांगणे आहे. आयुष्य असेपर्यंत सत्कर्म करावीत आपण ! कमी असतील, लहान असतील, मोठी असतील पण सत्कर्म करण्याकडे लक्ष पाहिजे. मनाने, वाणीने, शरीराने चांगली पुण्यकर्मे घडावीत तर त्या पुण्यकर्माचे फल म्हणजे मनाची शुध्दी होते. मनाच्या शक्तीचा विकास होतो. "बुध्दीमतां वरिष्ठम्" त्यावेळेला होता येते आपल्याला !

अनेक प्रकारच्या शक्ती आहेत. कितीही मोठा शत्रु असला तरी काही भय नाही. त्याकरता सत्कर्म हे एक मोठे साधन आहे. शुध्द-कर्म, पुण्य-कर्म करायची. शुध्द बुध्दी पाहिजे आणि त्याप्रमाणे जेवढी कर्म घडतील ती सत्कर्म म्हणावीत. ते जे बळ मिळते त्यामुळे मानसिक शक्तीचा विकास होतो. हनुमान जे आहेत ते 'जितेंद्रिय' आहेत. पूर्वीचे मोठेमोठे योगी हे सगळे ईश्वराची उपासना करणारे जितेंद्रिय आहेत. इंद्रिय ताब्यामध्ये असणे हे मोठे सामर्थ्य आहे. म्हणजे सगळ्या मानसिक शक्तींचा विकास आहे. भगवत् गीतेमध्ये भगवान सांगताहेत. 'श्रध्दावान लभते ज्ञानम् !' श्रध्दा पाहिजे. उपासना दृढ भावनेने चालू पाहिजे. पुण्यकर्म करावीत. इंद्रियांकडून चांगली कर्म करावीत. केवळ विषयांचा उपयोग सगळेच घेत आहेत. शास्त्रप्रकार, मोठेमोठे महर्षि यांनी संयतेंद्रिय होण्याकडे लक्ष दिले. मनुष्य जन्मामध्ये हे करता येण्यासारखे आहे ना? हाच विचार त्यांनी सतत केला. पशुपक्ष्यांना विचार करण्याची पात्रताच नाही. समोर काय दिसेल ते खायचे. मग ते आपले असो दुसऱ्याच असो. काही

मारल्यावर मग जायचे. तोपर्यंत खाणारच ते दुकानात असो, कुठेही असो. त्यांना ती बुध्दीच नाही. त्यामुळे त्यांच्यात पापपुण्याचा विचारच नाही.

पापपुण्याचा विचार मनुष्यांकरता केलेला आहे. शास्त्राने माणसांना हे सांगितले. त्यांना विचार आहे. बुध्दी दिलेली आहे. बुध्दीची शक्ति कमी आहे की जास्त आहे ह्याचा विचार करता येतो त्यांना. ती कशी वाढवायची हे ठरविता येते. म्हणून त्यांनी जर सत्कर्म केली तर बुध्दीचा पुष्कळ विकास होऊ शकतो. न्यायाने वागणारा जो आहे त्याला यश मिळते, जय मिळतो. हेच रामायणामध्ये सांगितले आहे.

म्हणून "सत्कर्म योगे वय घालवावे" हा एक सिध्दान्त लक्षात ठेऊन आपण आपली मानसिक शक्ती वाढविली पाहिजे. आपली इंद्रिये आपल्या ताब्यामध्ये आली पाहिजेत. त्यापैकी मन हे ताब्यात येणे अतिशय कठीण आहे. मनाचा निग्रह हा ज्याला साध्य झालेला आहे त्याला सगळे साध्य झालेले आहे. प्राणांचा निग्रहही त्याचा होऊ शकतो. प्राणवायूही त्याला थांबविता येतो. मन स्थिर झाल्यावर प्राणवायूही स्थिर होतो. त्यासाठी दोन मार्ग आहेत - बहिर्कुंभक आणि अंतर्कुंभक. हे एक प्रयोगशास्त्र आहे. अभ्यासाचे प्रकार आहेत. सांगणारे लोक पाहिजेत. त्या रीतीने मनाला स्थिर करता येते. जर मन हे ह्याच मार्गाने स्थिर झाले तर प्राणवायूही स्थिर होईल. त्या योगाने मानसिक शक्तीचा पुष्कळ विकास होतो.

हा सगळा शक्तीविकास पूर्ण झाल्यानंतर मग "सर्वा मुखी मंगल बोलवावे'' हे आहे. उगीचच सर्वांना काही उपदेश करणे, सभा सम्मेलने, प्रवचने ठेवणे, याचा काय उपयोग आहे ? अगोदर तुमच्या जवळ काही आहे का ? मग दुसऱ्यांना वाटा. अगोदर आपले हित साधून घेतल्या नंतर ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे कार्य करावे. ईश्वर सगळयांच्याकडून ते कार्य करून घेतो आहे. ईश्वराचे कार्य जगामध्ये चालू आहे. उपासना, नामजपयज्ञ करावा. सत्कर्माने वैयक्तिक उध्दार करावा.

मनामध्ये निरनिराळे विचार येतात आणि मन आवरले जात नाही. त्यामुळे कामक्रोधादिक विचार जे मनामध्ये उत्पन्न होतात त्यांनीही काही पातके आपल्या हातून घडतात. ती पापे न घडू देण्याची शक्ती संतांकडे आहे. ईश्वराची शक्ति त्यांनी मिळविलेली आहे. त्यांच सत्कर्म अखंड चाललेले आहे. त्यामुळे त्यांची शक्ती संपतच नाही. ईश्वरशक्तीशी त्याचा संबध जोडून गेलेला आहे. महानदीशी जोडणारा एखादा कालवा काढल्यावर महानदीतले पाणी शेतात काय किंवा कालव्यात काय अखंड येत रहाणारच.

अनेक ग्रंथ संतांनी लिहून ठेवलेले आहेत. महाराष्ट्राचे तर किती तरी भाग्य आहे. ज्ञानेश्वरी काय, भागवत काय, दासबोध काय किती तरी संतांचे पुष्कळ ग्रंथ मराठीमध्ये आहेत. त्यामुळे आपल्याला सहज मार्गदर्शन होऊ शकते आणि

हे एकदा समजून आल्यानंतर त्याप्रमाणे कोणते दोष माझ्याजवळ आहेत हे आपल्याला ओळखता येईल. आपण दुसऱ्याचे दोष पहायचा अभ्यास करतो ना ! स्वतःच्या दोषाची आम्हाला काही जाणीवच नाही. आमची चूक कधीही होत नाही अशीच कल्पना आम्ही करून घेतली आहे. दुसऱ्याची चूक मात्र काढतो.

तर अशारीतीने आत्मकल्याण करण्याकरता हे उपाय संतांनी सांगितले आहेत आणि नंतर समाजाचे कल्याण करण्याची शक्ती त्यांच्याजवळ उत्पन्न होते. ईश्वराची शक्ती त्यांच्या पाठीमागे आहे. मारूतीराय एकटे गेले पण त्यांना भीती वाटली नाही. तर असे जर 'बुध्दीमतां वरिष्ठम्' व्हायचे असेल तर त्याकरता सगळी साधने, मारूतीराय, रामचंद्रासारख्या आदर्श पुरूषांची चरित्रे आपल्या समोर ठेवली आहेत. एकदम कोणी मारूतीराय होणार नाही. एकदम रामाप्रमाणे होणे शक्य नाही. परंतु अनेक जन्मांचा अभ्यास आहे. मनुष्य जन्म आलेला आहे हा काही पहिला जन्म नाही, किंवा शेवटचा जन्म नाही हे आपले तत्वज्ञान आहे. तेव्हा मानव जन्माला येऊन वाईट संस्कार कोणते आहेत, चांगले कोणते आहेत हे जाणण्यासाठी आमच्या मनाचे निरीक्षण जर आम्हीच केले नाही तर दुसरा कोण करणार ? म्हणून आमच्या मनाचे निरीक्षण करून आणि त्याप्रमाणे गुणदोष जे असतील ते सगळे व्यवस्थित रीतीने घालविण्याचा प्रयत्न करणे हेच आवश्यक आहे.

ठेविले अनंते तैसेचि रहावे ।

चित्ती असू द्यावे समाधान ।

असे म्हणतात तुकाराम महाराज. हे शिकविले त्यांनी आम्हाला. हे ज्ञानेश्वरीच्या बळावरच त्यांनी शिकवले. सगळया संतानी याप्रमाणे बळ मिळवलेले असते आणि लोकांना ते उपदेश करीत असतात. त्यांना काही स्पेशल मोटार राज्यशासनाकडून लागत नाही, किंवा त्यांची काही व्यवस्था करावी लागत नाही. पायांनी जायचे-यायचे. काही कुणाजवळ मागायचे नाही. उपदेश करायचा म्हणजे गावातही कुणाजवळ मागायचे नाही. रात्रभर रहायचे आणि दुसऱ्या दिवशी निघून जायचे. त्यांचे हे कार्य सारखे चाललेले आहे. ईश्वराच्या कृपेने हे आपण पाहून त्याप्रमाणे परस्पर प्रेमाने रहावे. देवाजवळ प्रार्थना म्हणून करायची आहे, की ईश्वराची शक्ती आमच्या पाठीशी रहावी आणि आमच्या हातून पुण्यकर्म घडावीत ! एवढे धैर्य आणि एवढी शक्ती आम्हाला द्यावी एवढीच प्रार्थना ईश्वराजवळ आहे.

*॥ अवधूत चिंतन श्रीगुरूदेव दत्त ॥*

# श्री गुरू शरणम्

## प्रवचन तिसरे

**प.पू. श्री वामनराव गुळवणी महाराज यांच्या आज्ञेवरून गेली कित्येक वर्षे सौ. नीलाताई जोशी, बोरीवली यांचेकडे श्री गुरूपोर्णिमेचा उत्सव होत असतो. या उत्सवासाठी प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर आर्वजून उपस्थित राहून ह्या सर्व उत्सवाला फार मोठा आनंद प्राप्त करून देतात. आषाढी कार्तिकेच्या दिवशी त्यांचे प्रवचन होते. त्यांच्या शब्दा शब्दातून भक्ति, ज्ञान, प्रेम यांचा त्रिवेणी संगम झालेला दिसतो. दि. ५-८-१९८९ रोजी झालेले असेच एक प्रवचन.**

---

नारदांनी राजपुत्रांना उपदेश केला आहे. परमेश्वराला संतुष्ट करण्यासाठी त्याची कृपा प्राप्त होण्यासाठी काय उपाय आहेत त्याचे विवेचन नारदानी केले आहे. प्रपंचामध्येही आनंद असावा आणि परमार्थही मनाप्रमाणे चांगला व्हावा त्याकरीता ईश्वराचा प्रसाद आवश्यक आहे.

आम्हाला फक्त तीन अवस्था माहीत आहेत. जागृती, स्वप्नावस्था व गाढ झोप. जागृती अवस्थेत सर्व प्रपंच चालू आहे. स्वप्नावस्थेत स्वप्ने दिसतात. गाढ झोपेत सर्व संसाराचे व त्यांतील सुख दुःखाचे विस्मरण आहे, याच्यापेक्षा एक चौथी अवस्था आहे मनाची. बुध्दीला, मनाला अत्यंत स्थिरता मिळाली म्हणजे ही अवस्था प्राप्त होते. त्या अवस्थेत पूर्ण आनंद मिळतो. ईश्वराच्या स्वरूपाचे ध्यान हे जर सुरू झाले तर त्यायोगे समाधी आनंद मिळतो याला ध्यानयोग म्हणतात. अशी अवस्था प्राप्त होणे कठीण आणि टिकणे ही कठीण त्यासाठी अभ्यास सांगितला आहे. मनाला अत्यंत स्थिर बनवायचे आहे. ते झाले तर पूर्ण आत्मानंद प्राप्त होतो. मनामध्ये वासना आहेत. शुभ, अशुभ दोन्ही प्रकारच्या वासना आहेत. अज्ञानी जीवांच्या मनामध्ये त्या आहेतच. ज्ञान संपन्न महात्म्याना सुध्दा वासना क्षयासाठी अभ्यास करावा लागतो. मनाच्या वृत्ती थांबवण्यासाठी अभ्यास करावा लागतो. मनोनाश म्हणतात त्याला. मन एक क्षणभर जरी स्थिर झाले तर किती आनंद प्राप्त होतो. गाढ झोपेत मन विलीन झालेले असते. त्याच्या वृत्ती थांबलेल्या असतात. जागे होताच सगळया वासनासहित मन काम करायला लागते.

मनाबरोबर इंद्रिये आली. त्यामुळे नुसती समाधी अवस्था, आत्मसात होऊन भागत नाही तर मन स्थिर व्हावे लागते. म्हणजेच मनाचे बाहेर जाणे थांबावे

लागते. ईश्वरकृपेने मन एकदा आत्मस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर होऊन बसले की बाहेर जात नाही. मनातील सर्व वासना गेल्या पाहिजेत.

परमेश्वर आनंदरूप आहे. उपनिषदामध्ये त्याचे सुंदर वर्णन केलेले आहे.. ह्या आनंद स्वरूपात एकदा मन जाऊन स्थिर झाले की मग मन बाहेर पडण्याची शक्यता संपलेली असते. पूर्ण विदेही अवस्था आहे ही ! देहबंधन असेपर्यंत आत्मानंदामध्ये मन अगदी स्थिर होण्यासाठी सतत अभ्यास हवा. ही अवस्था प्राप्त करण्यासाठी नारदांनी तीन साधने सांगितली आहेत. भूतदया, भक्ती आणि संतोष.

अनेक प्रकारचा अहंकार आपल्या मनात असतो. चांगल्या कुळामध्ये आलेला जन्म, उत्तम, ऐश्वर्य, संपत्ती, ज्ञान यामुळेही मनात अभिमान उत्पन्न होतो. हा अभिमान कमी न होता वाढत जातो. ही सर्व सुखाची साधने आहेत. म्हणूनच कुंती भगवंताजवळ मागणं मागते की देवा, संकटामध्येच आम्हाला ठेव. संकटात अनेक दुःखे भोगायला लागली म्हणजे आम्हाला तुझी आठवण सतत राहील. माणसात कृतज्ञता बुध्दी फार कमी आहे. ईश्वराने किती आपल्याला दिले इकडे आपले लक्ष नाहीये. आणखी वासना वाढती आहे. पण ज्याच्या मनात विवेक आहे त्यालाच ईश्वराबद्दल कृतज्ञता वाटते. अनुकूल परिस्थितीत कोणचा दोष निर्माण होण्याची शक्यता आहे हे त्याच्या लक्षात येईल. कुंतीच्या हे लक्षात आले. सर्व संत महात्मे ईश्वर स्मरण आपल्याला निरंतर रहावे याचा नेहमी विचार करतात. विस्मरणाची जी साधने असतील त्यापासून आपले मन दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

अभिमानादी विकार मनामध्ये असताना दया उत्पन्न होणे शक्य नाही. जो स्वतःच्या अहंकारात निमग्न असतो त्याला दुसऱ्याचा दुःखाची कल्पनाच येत नाही. 'दया सर्व भूतेषु' सर्वांसाठी दया उत्पन्न झाली पाहिजे. ज्ञानेश्वर महाराज तर मागणी करतात. **"भूता परस्परे जडो मैत्र जीवांचे"**. एकमेकांच्या सुख दुःखाची भावना सर्वांच्या मनामध्ये पाहिजे. दुसऱ्यांच्या दुःखाबद्दल मनात दया उत्पन्न झाली पाहिजे.

भागवतामध्ये दोन उदाहरणे दिली आहेत. एक रतिदेव राजाचे व दुसरे द्रौपदीचे. अयाचित वृत्तीने रतिदेव राजा अरण्यात रहात आहे. कोणी आणून दिले तर त्यावर निर्वाह करायचा. एकदा त्या राजाला ४६ दिवस अन्नपाणी मिळालं नाही. मनाचा निग्रह आहे. अभिमान उत्पन्न होऊ नये म्हणून साधनांचा उपयोग आहे. कुणीतरी अन्न आणून देतो. सैंपाक तयार झालेला आहे. इतक्यात एक अतिथी येतो. त्याला अन्न दिलं. आता जेवायला बसणार इतक्यात दुसरा अतिथी येतो त्याचेबरोबर आणखीनही कोणीतरी आहे. त्या सर्वांना अन्न देऊन टाकतो. फक्त पाणी शिल्लक आहे. त्यासाठीही एक तहानलेला मनुष्य आला

आहे. त्याला सर्व पाणीही दिलं आहे वर ईश्वराची प्रार्थना रतिदेव राजा करतो आहे. "सर्व दुःखी जीवांच्या शरीरामध्ये मला ठेवा. सर्वांची दुःखे मला द्या" **'सर्वेपि सुखिनः सन्तु'** ह्या भावनेचा अनुभव आपल्याला नाही. भूकेने जीव व्याकुळ झाला असतानाही दुसऱ्याविषयी मनात दया उत्पन्न होणे हे विलक्षण आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश तेव्हा प्रकट झाले आहेत आणि त्याला आशिर्वाद दिले आहेत.

दुसरे उदाहरण द्रोपदीचे आहे. भारतातील युध्दाचा अठरावा दिवस! युध्द संपलेले आहे. दुर्योधन ही शेवटी पडतो. कौरवांकडील तीन माणसे जिवंत आहेत. अश्वत्थामा, कृपाचार्य आणि कृतवर्मा. अश्वत्थाम्याच्या मनात पांडवाच्याबद्दल द्वेष निर्माण झाला. पांडवाचा सेनापती धृष्टधुन्माने द्रोणाचार्यांना मारलं आहे. तेव्हां धृष्टधुन्म व सर्व पांडवांचा नाश करायचा असे त्याने ठरविले. मनातील दया संपली आहे फक्त द्वेष शिल्लक राहीला आहे. अश्वत्थाम्याने रात्रीच्या वेळी शिबिरात जाऊन धृष्टधुन्माला प्रथम मारलं. पांडव समजून द्रौपदीच्या पाचही मुलांना ठार करून तो चालता झाला आहे.

सकाळी हे वृत्त पांडवाना समजले तेव्हा त्यांचा क्रोध व शोक अनावर झाला आहे. द्रौपदी तर मूर्च्छित पडली आहे. राज्याकरता एवढा प्रयत्न करून शेवटी आपल्याला तरी काय मिळालं या दुःखाने द्रौपदी सुध्दा व्यथित झाली आहे. कृष्णार्जुन अश्वत्थाम्याला पकडून द्रौपदीसमोर आणतात. अर्जुन सांगतो 'द्रौपदी हा तुझा शत्रु तुझ्यासमोर आणला आहे. त्याला काय शिक्षा द्यायची आहे ते सांग'.

अत्यंत शोकाकुल झालेली द्रौपदी खालीमान घालून रडते आहे. आपली पांचही मुले ज्याने मारली, भावाचा वध केला असा हा अश्वत्थामा हात बांधलेल्या अवस्थेत द्रौपदीसमोर उभा आहे. त्याची मान खाली झाली आहे. द्रौपदी धर्मज्ञ तर आहेच पण भगवत् भक्तही आहे. तिची कर्तव्य बुध्दी जागृत होते. तिचे दुःख बाजूला गेलं. तिने उलट अश्वत्थाम्याला नमस्कार केला आहे. गुरूपुत्र आहे तो. अर्जुनाला द्रौपदी सांगते की "याला सोडून द्या जीवदान द्या" तिच्या या उद्गारानी सर्व चकीत झाले आहेत. द्रौपदी सांगते आहे की अश्वत्थामा ब्राह्मण आहे. त्यात ज्या द्रोणाचार्यांकडून तुम्ही अस्त्रज्ञान व सर्व विद्या प्राप्त केली, त्यांचीच ही साक्षात मूर्ती आहे. याला मारणे म्हणजे द्रोणाचार्यांना मारल्याचा दोष आहे." हे सर्व सांगताना तिची धर्मज्ञ वृत्ती जागृत झाली आहे. मनामध्ये दया उत्पन्न झाली आहे. वैर केव्हाच लोपलं आहे. **'निर्वैरः सर्व भूतेषु यः स मामेति पाण्डव'** भगवद्गीतेत भगवान म्हणताहेत की माझ्याजवळ कोण येतो ? **कोणाही जीवाचा न घडो मत्सर हे** ज्याला साध्य झाले आहे तोच येतो.

सर्वत्र एक परमात्मा भरलेला आहे अशी भावना झाल्यामुळे द्वेष कोणी कोणाचा करायचा ?

द्रोपदीने सांगितलेले तिसरे कारण तर अत्यंत विचारणीय आहे. ती म्हणते की, अश्वत्थाम्याची माता अद्यपि जिवंत आहे. पती द्रोणाचार्य तर गेलेच. याला जर तुम्ही मारलंत तर तिचे आभाळच फाटेल. पुत्रशोकाचे दुःख किती आहे ते मी आज अनुभवले आहे. ते दुःख त्या माऊलीला होऊ नये एवढीच माझी इच्छा आहे."

धर्माबद्दल, ईश्वराबद्दल संयम बाळगणारी द्रौपदीची केवढी मोठी भूमिका आहे ! भगवत् गीतेमध्ये भगवान सांगताहेत **"आत्मौपन्येन सर्वत्र समं पश्यन्ति योऽर्जुन । सुखं वा यदि वा दुःख स योगी परमो मतः"** आपल्या सुख दुःखाप्रमाणेच दुसऱ्याच्याही सुख दुःखाचा विचार ज्याच्या मनामध्ये येतो आहे तो मोठा योगी आहे. अशी मनाची तयारी द्रोपदीची झाली आहे. **'दया सर्व भूतेषु'**, शत्रु का असेना त्याच्याबद्दल दया असली पाहीजे. त्याच्या आईला दुःख देऊ नका ही अंतःकरण वृत्ती तयार करायला किती वेळ लागेल ? तो काय चार सहा वर्षाचा विश्व विद्यालयीन अभ्यासक्रम आहे ? तिथे ईश्वराची कृपा हवी. सद्गुरूंच्या, महात्म्यांच्या कृपेनेच अंतकरण असे निर्दोष होऊन जाते. विवेक जागृत होतोय. अश्याच ठिकाणी दया उत्पन्न होणार.

विवेक संपन्न अंतकरण कसं असतं याबद्दल प्रभु रामचंद्राचं उदाहरण आहे. कैकयी मातेने वनात जायला सांगितले त्याबद्दल राग नाही. निंदा तर नाहीच नाही. प्रभु सांगताहेत की कैकयीने माझ्यावर कृपाच केली आहे. मला एकट्याला वनात पाठवलं. राज्याचा सर्व भार भरतावर टाकला आहे. राज्य संरक्षणाची चिंता मला नाही, भरताला आहे. हे माझ्यावरील मातेच्या प्रेमाचेच उदाहरण आहे. कैकयीने रामाना दुःख देण्याचा प्रयत्न केला आहे. अश्यावेळी रामप्रभु विवेक करतात आणि लोकाना कैकयीची निंदा करू नका म्हणून सांगताहेत. अविवेक मनामध्ये जोपर्यंत आहे तोपर्यंत संसार आहे. पूर्ण विवेक उत्पन्न झाल्यामुळे परमार्थ सिध्द होतो आहे.

नाथाचं उदाहरण आहे. नाथ महाराज शांतीप्रभू आहेत. त्याना राग येण्यासाठी एक यवन त्यांच्या अंगावर थुंकतो आहे. नाथ महाराज तितक्या वेळां गंगेचे स्नान करताहेत. शेवटी यवन शरण आला आहे. त्याला नाथ सांगताहेत अरे तुझ्यामुळे आम्हाला गंगास्नानाचं पुण्य मिळालं. इथे पूर्ण विवेक आहे. दुसऱ्याने दुःख देण्याचा प्रयत्न केला तर विवेकाने दुःख विसरून जाऊ शकतो मनुष्य. दयेने विवेक उत्पन्न होतो म्हणून दया हा मोठा गुण सांगितलेला आहे.

द्रौपदीची भगवद्भक्ति तर परीपूर्ण आहे. गोपालकृष्णानी तिला आपली बहीण मानले होते ते **'यथा देहे तथा देवा'** अशी भक्ती होती म्हणून. कृष्णानी एकदा

परीक्षा पाहीली. त्यांच बोट कापलं. रक्त येऊ लागलं सख्खी बहीण सुभद्रा जवळच होती. ती तर राजपत्नी होती. पण तिला राजवाड्यात तेलात बुडवून कृष्णाच्या हाताला बांधण्यासाठी चिंधी काहीं मिळाली नाहीं. द्रौपदीच्या कानावर हे गेले मात्र, आपल्या भरजरी शालुचा तुकडा फाडून, तेलात बुडवून कृष्णाच्या बोटाला बांधुन ती केव्हाच मोकळीही झाली !

ईश्वर ही भावना आहे. गोपाळ कृष्ण म्हणजे प्रत्यक्ष वैकुंठपती आहेत. ही भावना दृढ आहे. प्रेम तर ओतप्रत आहे. त्यामुळे शालुही फाडायला मनात विकल्पच उत्पन्न झाला नाहीं. आपलं मन सुभद्रे सारखं वस्त्रा मध्ये, घरदारात, शरीरामध्ये गुंतून राहिलं आहे. आपलं सगळं सुरक्षित ठेवुन देवाला कांही करता आलं तर करायचं. देव तेही मान्य करतो. **'पत्रं, पुष्पं, फलं तोयम्'**

द्रोपदीच्या वस्त्रहरणाचा प्रसंग असाच तिच्या भगवद्भक्तीची कसोटी घेणारा आहे. सभेत भीष्माचार्यांपासून सर्वांनी असमर्थता प्रगट केली आहे. अशावेळी द्रौपदी गोपाळ कृष्णांचं स्मरण करते आणि देवा धावा म्हणून म्हणते आहे. कृष्ण धावुन येतो आहे आणि द्रौपदीची बिटंबना टळते आहे. देवाला ऐकू जाईल कां हा प्रश्न तिच्या मनात आला नाही कारण परमात्मा सर्वव्यापी आहे. अशी ही डोळस ज्ञानभक्ती आहे.

दुसरंही असंच सत्व परीक्षा घेणारे उदाहरण महाभारतकारानी सांगितलं आहे. पांडव वनात आहे. इकडे दुर्वास मुनी हस्तिनापुरात आलेले आहेत. त्यांची उत्तम सेवा दुर्योधनाने केली आहे. दुर्वासमुनी प्रसन्न झाले आहेत. वर माग म्हणुन दुर्योधनाला म्हणतात तर तो म्हणतो, त्यानी पांडवांची परीक्षा करावी अतिथी म्हणून दुर्वास मुनीनी पांडवांकडे जावे. पहा संताच्या संगतीत दुर्योधन होता पण बुध्दीत फरक पडला नाही. दुर्योधन त्यांना सांगतो की महामुनी तुम्ही केव्हा जाल, तर द्रौपदीचे जेवण झाल्यावर जा. द्रौपदीला सूर्यनारायणाने पात्र दिले आहे तिचे जेवण झाल्यावर मात्र त्या पात्रातुन काही मिळणार नाही. अश्यावेळी आपण जावे. दुर्वासाना जाणे भाग पडले. तेही ज्ञानी होते पण संगतीत सापडले नां ! दुर्योधनाचा वर पुरा करणे भाग होते. ते रात्रीच्या वेळी पांडवाकडे वनात येतात. आम्हाला जेवण पाहीजे म्हणतात. द्रौपदी धर्माचरणी आहे. धर्माचरण ईश्वराला प्रिय आहे. आपण जेवलो आणि नंतर जर कोणी ऋषी मुनी आले तर हा विचार नित्य तिच्या मनात आहे. आपल्याला एखाद्याच दिवशी आषाढी असते तिला तर रोजची एकादशी होती.

धर्मराज सुध्दा मोठ्या संकटात सापडले. त्यांचेही धर्मसामर्थ्य मोठे होते पण ते ह्यावेळी उपयोगी पडणारे नव्हते. त्यांचे धर्माचरण हे काहीं घराकरीता चाललेले नव्हते. ईश्वराची आज्ञा म्हणून धर्माचरण ते करताहेत. काहीं फळाची अपेक्षा ठेवून धर्माचा व्यापार ते करणार नाहीत. ईश्वरावर भरवसा ठेवून ते स्वस्थ आहेत.

द्रौपदीची सत्वपरीक्षा होती. तिचे जेवण झालेले आहे. सूर्यथाळी घासून/पुसून स्वच्छ झालेली आहे. अश्या वेळी तिने त्या सर्वव्यापी ईश्वराचा धावा आरंभिला. कृष्ण भगवान धावून आले आहेत. सूर्यपात्र आण म्हणाले द्रौपदीला. त्या थाळीला एक पान चिकटलेले दिसले त्याना. ते खाऊन तृप्तीची ढेकर देताहेत. भगवान 'पत्रं, पुष्पं फलं तोयं' काय एका बारीकश्या पानानं भगवान संतुष्ट होताहेत आणि इकडे दुर्वासमुनी व त्यांच्या हजार शिष्यानाही आणलं पोट भरण्यासारखं वाटतय. ते द्रौपदीच्या घरी येण्याचीही तसदी घेत नाहींत परस्पर निघून गेलेले आहेत.

हा चमत्कार नाही. द्रौपदीच्या धर्माचरणाचे, भगवद्भक्तीचे उदाहरण म्हणून व्यासमहर्षींनी हा प्रसंग लिहीला आहे. भक्ताचं सत्व संरक्षण परमेश्वर करत असतो हे सांगण्यासाठी हे द्रौपदीचे चरित्र अभ्यासले पाहीजे.

द्रौपदीच्या कळवळुन सांगण्याचा परिणाम अश्वत्थाम्यावरही झाला आहे. त्यानेही शस्त्रसंन्यास स्वीकारला आहे. द्वेषबुध्दी सोडून गेली आहे. तो द्रौपदीच्या ह्या विलक्षण दयाधर्माने.

वैयक्तिक असे दुसरे साधन नारदमुनी सांगताहेत. दयेच्या भोगाने वैयक्तिक उन्नती होते. दुसऱ्याचेही कल्याण होते. त्यात आनंद आहे की नाही, शांती आहे की नाही हे पहावयाचे नाही तर स्थिती बदलण्याचा प्रयत्न करायचा. हा वैयक्तिक गुण आहे. आपली भूमिका अधिकाधिक उदास करायची आहे. त्यात दयेबरोबर संतोषही आला पाहीजे. **"संतुष्यान् येन केन वा"** येथे विवेक हवा आहे. विवेकामुळेच अंतकरणात समाधान उत्पन्न होत आहे. **'चित्ती असो द्यावे समाधान'** ते हे समाधान आहे.

धर्मराजाला आपले ऐश्वर्य दाखवून हिणविण्याकरता दुर्योधन वनात आला आहे. पण चित्रसेन गंर्धवानेच दुर्योधनाचे गर्वहरण केलेले आहे. दुर्योधन महाराजाना सोडवा म्हणून दुर्योधनाचे दूतच धर्मराजाकडे आलेले आहेत. अश्यावेळी धर्मराजाने काय करावे ? **'जैसी स्थिती आहे । तैसा परि राहे'** म्हणुन स्वस्थ बसायचे ! धर्मराज धर्मकारण करणारे पण राजनितीज्ञ आहेत. ते सांगताहेत गंधर्व परके आहेत. आपलं भांडणं आपल्यात मिटवू. आता गंधर्वापासून दुर्योधनाला सोडविणं ही राजनीती आहे आणि ती विवेक संपन्न राजनीती आहे. काटयाने काटा काढावा असे म्हटलेले नाही. समाजधर्म, राजधर्म असे वेगळे आहेत त्याच ज्ञान असेल तर तो धर्मात्मा राजा. त्यातही पुनः दया आली. आपल्यावर असा प्रसंग आला असता तर ! ही बुध्दी आहे त्यामुळे दया करतानाही उपकाराची भावना नाही. ती सहज प्रवृत्ती आहे.

संतोष हा वैयक्तिक गुण आहे. ज्याला ईश्वराच्या जवळ जायचय त्याला संतोष हवा ईश्वरावर सर्व भार घालायला शिकायचे आहे. इतकं अन्नधान्य, संपत्ती

असली तरी ते सर्व ईश्वराचे आहे. सुदामजी दरिद्री होते. पत्नीच्या आग्रहामुळे द्वारकेला आले आहेत. त्याचेजवळ राहिले आहेत. श्रीकृष्णाकडे मागायला विसरले आहेत. श्रीकृष्ण देव आहे ही भावना दृढ आहे त्यामुळे त्याचेकडे काय मागायचे ? श्रीकृष्णानी सुध्दा सुदामजीना त्यावेळी काही दिलं नाही पण सुदामजीकडचे पोहे मागायला मात्र विसरले नाहीत. आपण दरिद्री आहोत आणि हा सखा कृष्ण श्रीमंतीत लोळतो आहे म्हणुन मनात संदेह, विकल्प काही नाही. कारण संतोषाचा अभ्यास आहे. तो मनात समाधान अखंड भरून वाहतो आहे.

सुदामजी घरी आले आहेत. पाहतात तो द्वारका नगरी सारखी नगरी झाली आहे. पत्नी मोठा थाट करून ओवाळायला आलेली आहे पण सुदामजी तटस्थ आहेत. देवानं दिलं म्हणून आनंद नाही किंवा दिलं नाहीं म्हणून दुःख नाही. देवाच्या आज्ञेचे फक्त पालन करायचे. हे साधकाचे कर्तव्य आहे. त्यासाठी संतोष वृत्तीचा अभ्यास आहे.

नारद महर्षिनी तिसरा गुण इंद्रिय संयम सांगितला आहे. परमेश्वराला ऋषिकेश म्हटलं आहे. ऋषिक म्हणजे इंद्रिय. त्या इंद्रियांचा स्वामी तो ऋषिकेश. त्याची प्रार्थना करा, त्याचेकडे तक्रार करा म्हणजे इंद्रिये ताब्यात येतील. सगळं आयुष्य संसारात जाते अशी आमची तक्रार सांसारिक म्हणजे संतोषही नाही आणि इंद्रियनिग्रह नाहीत.

इंद्रियाचा निग्रह करा म्हणून शास्त्रकार सांगतात. मनातल्या सर्व कामना काढून टाकाव्यात पण इंद्रियाचे नियंत्रण हे देखिल साधन म्हणून त्यानी सांगितले आहे. देवाजवळ सुध्दा काहीं मागायचं नाही. आषाढीच्या वारीला सर्व संतमंडळी पांडुरंगाचे दर्शनासाठी वारीला जायची. पांडुरंग सर्वांशी बोलायचा, चौकशी करायचा पण तुकाराम महाराज आले की खाली मान घालुन बसायचा. भक्त विचारावयाचे, बाबानो तो काहीं मागत नाही म्हणुन मला खाला मान घालावी लागते. देवाला सुध्दा खाली मान घालायला लावणारे समर्थ भक्त आहेत. केवढा मोठा अधिकार आहे. संतोष वृत्तीच्या अभ्यासाने इंद्रीये ताब्यात येतात.

काम, क्रोध, लोभ, दंभ असे अनेक विकार मनामध्ये उत्पन्न होतात. प्रत्येक विकारावर ताबा कसा मिळावा ह्याची साधनेही सांगितली आहेत. पण एक महत्वाचे साधन म्हणजे गुरूभक्ती. ह्या गुरूभक्तीच्या योगाने सर्व विकारांचा नाश होतो. सद्‌गुरू हे ईश्वरस्वरूप आहेत. तशी सद्‌गुरूंच्या ठिकाणी भक्ती निर्माण व्हावी. त्यातच कल्याण आहे. श्रीगुरू चरित्रातील दुसऱ्या अध्यायात दीपकाची कथा दिली आहे. दीपकाचे सद्‌गुरू ज्ञानी, महात्मा आहेत. प्रारब्ध भोग भोगावयाचे आहेत. म्हणुन काशीला आलेले आहेत. आपण सेवा करू म्हणुन दीपक बरोबर आहे. प्रथम सद्‌गुरूंचा प्रारब्ध भोग स्वतः भोगायची तयारी दाखविली. पण असे करता येत नाही हे कळल्यावर कुष्टरोगी गुरूची सेवा दीपक

मनोभावे करतो आहे. गुरूंची सेवा सोपी नाही. गुरू रागावताहेत, चिडताहेत पण तरीही सेवा करायची. काशीत राहूनही विश्वेश्वराचे दर्शन नाही. विश्वेश्वरच प्रसन्न होऊन वर माग म्हणतात. त्यावेळीही गुरूना बरे वाटावे हा वर मागण्याचे मनात येते. त्यावर 'गुरूची सेवा करायला कंटाळलास म्हणुन असा वर मागतोस' असे सद्‌गुरू रागावतात. इकडे त्यांच्या गुरूभक्तीने प्रसन्न होऊन विष्णु येतात. त्यानाही दीपक सांगतो की आपल्या गुरू महाराजाची इच्छा नाहीं. आमच्या गुरूंच्या ठिकाणी आपणच आहात मग वर कशासाठी? अशी भक्तीभावाने ओथंबलेली वृत्ती आहे. देवांचा फारच आग्रह पडला म्हणून अखेर दीपक मागतो आहे.

*'गुरूभक्ती होय अधिक मानसी ।*
*ऐसे ज्ञान मज द्यावे ऋषिकेशी ॥'*

इतके दिवस गुरूभक्ती करूनही मनात अहंकार झाला नाही. इथे संतोष वृत्ती उपयोगी नाही. 'माझी गुरूभक्ती खूप झाली आहे. इतकं तरी कोण करणार आहे' अश्या प्रकारचा संतोष उपयोगी नाही. जास्ती जास्ती गुरू भक्ती वाढावी ही मनोभूमिका पाहिल्यावर नारायण संतुष्ट झाले. गुरूमहाराजही संतुष्ट झाले. दीपकाला जीवनमुक्त अवस्था प्राप्त झाली आहे.

मनाची स्थिरता साधण्यासाठी ही सगळी साधने आहेत. **"विसभ्रमा सोडीती ते कृतार्थ"** संसार भ्रम दूर करता आला पाहीजे. आत्मज्ञानाकरीता अनात्म पदार्थाबद्दल असंग आणि परमात्म्याबद्दल संग एवढे दोन उपाय शास्त्रकारानी सांगितले आहेत. हे दोन उपाय व दया, संतोष व इंद्रिय निग्रह ही तीन साधने आत्मज्ञानासाठी आहेत. सद्‌गुरूंची सेवाभक्ती म्हणजेच ईश्वराची उपासना आहे. ही सर्व साधने आपोआप प्रगट होतात.

सर्वांची दुःखे पाहून आपल्याला दुःख होते. दया उत्पन्न होते. ह्या दया भावनेचा जेवढा विकास होईल तेवढी आपली भूमिका उंच उंच होत जाईल. तस तसा तो जीवात्मा ईश्वरस्वरूप होऊन जाईल. हा अभ्यास करण्यासाठी शरीर, मन, इंद्रिये ही सर्व साधने ईश्वराने दिली आहेत. ती समर्थ बनवण्याकरता ईश्वराची उपासना केली पाहीजे. ईश्वरभक्तीचा उपयोग असेल तर हा आहे. ईश्वराच्या भक्तिमुळे साधकाचा आपल्या अंतकरणावर ताबा राहतो.

कृष्णभक्त अर्जुनाची महाभारतात कथा आहे. स्वर्गलोकात अर्जुन गेलेला आहे. उर्वशीकडे पाहतो आहे. उर्वशीला वाटलं अर्जुनाच्या मनात अभिलाषा उत्पन्न झाली आहे. ती भेटते तेव्हां अर्जुन तिला सांगतो की तुम्ही आमच्या कुलाच्या जननी आहात, म्हणुन मी मातेच्या प्रेमाने आपल्याकडे पाहतो आहे. उर्वशीची निराशा होते ती त्याला नपुसंकाचा शाप देते. इंद्र मदतीला येतो. अज्ञातवासात तुला या शापाचा उपयोग होईल म्हणून अर्जुनाचे समाधान करतो.

अर्जुन ईश्वरकृपेने जितेंद्रीय झाला आहे. अर्जुनाला ब्रह्मास्त्र विद्येचे ज्ञान होते. अश्वत्थाम्यालाही होते. पण अस्त्र परत घेण्याचे माहीत नव्हते. प्रयोग करणे व उपसंहार करणे या दोन्हीचे ज्ञान असणारा खरा वैज्ञानिक. एका निमिषात सर्व जग अणु स्फोटाने नाहीसे होईल पण पुनः जिवंत करून कोण दाखविल ?

सद्गुरूंच्या स्वरूपामध्ये, महात्म्यांच्या स्वरूपामध्ये भगवानच सर्वत्र मार्गदर्शन करीत आहेत. हे एकलव्याचे उदाहरण पहा. त्याने द्रोणाचार्यांना मनोमनी गुरू केले. एकनिष्ठपणे अभ्यास केला. भुंकत येणाऱ्या कुत्र्याच्या तोंडात त्याने असे बाण मारले की त्या कुत्र्याच्या तोंडाला इजा झाली नाही. तोंड मात्र बंद झाले. हे कौशल्य अर्जुनाला सुध्दा मिळविता आलं नाही. हे एकलव्याच्या गुरूभक्तीचे फळ होते.

आपल्या मनात सतत विवेक हवा. आपली निष्ठा वाढविण्याचे प्रयत्न करावयाचे. दीपकासारखी गुरूभक्ती किंवा द्रौपदीप्रमाणे भगवतभक्त्रि अंतकरणात निर्माण झाली पाहीजे. ईश्वराचे मनात आपले विषयी दया उत्पन्न झाली पाहिजे. म्हणजे तो शक्तीमान परमात्मा आपले कल्याणच करतो. ईश्वरकृपेत राहून गुरूंच्या कृपेने समाधीसिध्दी प्राप्त करून घ्यायची.

या ठिकाणी श्री गुरू पोर्णिमेचा उत्सव सौ. नीलाताई जोशी, त्यांचे पती श्री कृष्णराव जोशी, त्यांची सर्व कुटुंबीय व गुरूभक्त मंडळीच्या गुरूभक्त्रिने सतत प्रतिवर्षी करीत असतात. त्यांच्या ह्या सोहळयात आम्हालाही सेवा करण्याची संधी गुरूकृपेने प्राप्त होत असते. अशीच ईश्वकृपा सर्वांच्यावर व्हावी, या भक्त्रि वर्णाची अभिवृध्दी व्हावी अशी ईशचरणी प्रार्थना आहे.

# प्रतिबिंब

प.पू. महाराजांची आज पुण्यतिथी. या निमित्ताने त्यांचे स्मरण अंतःकरणात अधिक उमलत असते. त्यांचे विचार मनाला एका जीवन प्रणालीची दिशा देत असतात. प.पू. वामनरावजी गुळवणी महाराजांचे विचार तत्वचिंतनात्मक असत. त्यांचे बोलणे कमी होते तरी ते विचार म्हणजे सुविचार मौक्तिके होती. त्यातील ओघळलेल्या मोत्यांचा हा स्मरण सर ओवायचा प्रयत्न केला आहे.

भारतीय संस्कृतिबद्दल बोलताना ते म्हणत असत, सिंधुसंस्कृती, वैदिक संस्कृती, ग्रीस संस्कृती वगैरे अनेक संस्कृती होऊन गेल्या. काळाच्या ओघात त्या नाहीशा झाल्या. ग्रीक संस्कृतीचा परिणाम बराच काळ टिकला. वैदिक संस्कृती भारतीय संस्कृतीच्या रूपाने आजही जिवंत आहे. चार पाच हजार वर्षे ती टिकून आहे. भारतीयांचे मन केवळ बुध्दीच्या क्षेत्रात रमणारे नाही.

श्री ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत म्हटल्या प्रमाणे "तर्काचिये दिठी गोचरे नोहे किरिटी या उक्तीप्रमाणे बुध्दीच्या पलीकडच्या प्रांतात प्रतिभा शिरते. प्रतिभा ही अधिक सूक्ष्म आहे. पूर्वीच्या ऋषीमुनींनी शक्तिशाली प्रतिभेच्या सहाय्याने एक अध्यात्मवादी तत्वज्ञान निर्माण केले मानवी जीवनाला सुंदर आकार दिला. प.पू. स्वामी महाराजांचा उल्लेख या बाबतीत वारंवार ते करीत असत त्यांचे सर्व साहित्य असे अनुभूतीजन्य होते असे आदराने सांगत.

गुरूमहाराज म्हणत असत पाश्चिमात्य देशात विज्ञानाचा उदय झाला त्याचा प्रभाव फार परिणामकारी होता. भारतीय संस्कृतिला त्यामुळे हादरे बसले ती हटली. पण नामशेष झाली नाही. ती टिकून राहण्याचे कारण तिच्या मुळाशी असलेल्या शुध्द अध्यात्मिक प्रेरणा होत्या. विज्ञानाने दिलेल्या सुविधा ते मानीत पण ते म्हणत असत वस्तूचे बहिरंग विज्ञानाने कळेल पण वस्तुचे अंतरंग मात्र विज्ञानाने कळत नाही.

केवळ संपत्तीत किंवा देहसुखात रमणारे भारतीय मन नाही. माणसाच्या हृदयात परमेश्वर आहे व त्याची सेवा केली तर ती ईश्वराला चटकन पोचते अशी आपली विचारसरणी सामाजिक प्रेरणा देणारी आहे. "जे जे देखे भूत ते ते मानिजे भगवंत हा भक्तियोग निश्चित जाण माझा" असे श्रीज्ञानदेवांनी म्हटले आहे. मानवी जीवन समाजाभिमुख बनवून मी कोण या मूलभूत विषयाकडे नेणाऱ्या विचारधारा आहेत. अशी त्यांची धारणा होती. ते नेहमी म्हणत असत की संत हे आत्मसाक्षातकारी असतात. संतानी नेमकी एकच गोष्ट ओळखली की माणसाचे अंतरंग सुधारले तर माणूस सुधारतो. माणूस सुधारला की समाजही एका वेगळ्या उंचीवर जोतो. या अंतरंग सुधारण्यामुळे माणूस असूया मत्सर स्पर्धा सारे विसरले. शुध्द प्रेमकरण्याची कला तो शिकेल. हे शिकविण्याचे

काम गाजावाजा आरडा ओरडा न करता प्रसिध्दीची हाव न धरता आपल्या संतानी अनेक वर्षे केला संताच्या कष्टाला सीमा नव्हती असे गुरूमहाराज म्हणत असत ही त्यांची नुसती विचारसरणी नव्हती त्यांचे वागणे अतिशय प्रेमळ होते. सर्वांची कणव त्याना होती. या सर्व आचार विचारांच्या गुंफणीतून एक विचार पध्दती त्यांनी त्यांच्याभोवती असलेल्या बाल तरूण आबाल वृध्द उच्च शिक्षित गरीब श्रीमंत सर्वांना शिकविण्याचा प्रयत्न केला अनेकांना सत्पथ दाखविला. ती विचारधारा कृतीतून होती. अनुभूती त्याना होती. अनुभवाकडे वळविणारे शक्ति साधन ज्यांनी मागितले त्याना मुक्त हस्ते दिले. मोठया लोक समुदायात राहूनही त्यांनी आपले गुरूत्व सदैव लपविले, ते नम्रतेने वाकलेले होते.

सामान्य माणूस भोगवादी असतो. त्याला फार उच्च तत्वज्ञान पेलणार नाही हे जाणून ते सदैव साधनरत राहण्याचा सर्वांना उपदेश करीत, "आपल्या संसारात रहा कलेचा आस्वाद घ्या योग्य तऱ्हेने पैसा मिळवा संकटाने खचून जाऊ नका कोणाचे अंतःकरण दुखवू नका" त्यानी दिलेल्या साधनाने तीन गोष्टी घडतात. उत्तम विचार, भगवंताबद्दल प्रेम, दुसऱ्याच्या सुख दुःखाबद्दल आत्मीयता सत्कृत्ये करण्याचा बुध्दीचा व शरीराचा आवांका, बुध्दी व मनाची पवित्रता या गोष्टी गुरूकृपेने करण्याने सतत साधनेने घडण्यास मदत होते. गुरू महाराजांनी सांगितलेल्या गोष्टींचे जर सतत चिंतन केले व दिलेले साधन करीत राहिले तर माणूस आत्मसन्मुख राहून कार्य करीत राहतो. नुसते घरी बसा असा निवृत्ती प्रधान संदेश त्यानी कधी कोणाला केला नाही त्यांच्या गुरूकृपेचे हे फार मोलाचे वैशिष्ठ्य आहे.

त्यांचे सर्वांवर असलेले निष्काम प्रेम विश्वाला गवसणी घालणारे होते. श्रीमन् वासुदेवानंद स्वामी महाराज व लोकनाथतीर्थ स्वामी महाराज यांनी हे गुरूमहाराजांचे सारे अंतकरण जपून आपली ज्ञानगंगा त्यांचे स्वाधीन केली गुरूभक्त ही उपाधी गुरूमहाराजांना अतिशय शोभून दिसते व त्यांना ती आवडतही असे. त्यांची गुरूनिष्ठा अतिशय होती गुरूवचनाचे पालन ते तंतोतंत करीत. नैष्ठिक ब्रह्मचर्याने उजळून निघालेले त्यांचे जीवन या दोन संताच्या कृपेने सुवर्णमय झाले म्हणूनच भारतीय संस्कृती टिकविणारी अशी शक्तीशाली जगदंबा चैतन्य चक्रवर्तीची शोभा प.पू. गुळवणी महाराजांचे स्वाधीन केली. ती गंगा प.पू. महाराजांनी घरोघरी पोचविली. अशा विशुध्द जीवनाबद्दल किती लिहावे? शब्द संपतात, वाणी मौन, होते नेत्र अश्रुंनी भरतात. मनांतून अनंत भाव उसळून येतात. माझे मन हरपून जाते. मन त्यांच्या पदकमली केंव्हाच लीन होते अस हे थोर संतजीवन पाहण्याचे भाग्य अनेक वर्ष लाभले व आज ही लाभत आहे.

ते म्हणजे बिंब प्रतिबिंब या उक्ती प्रमाणे भासणारे प.पु. दत्त महाराज ! गुरू महाराजांनी देह ठेवल्यावर विकल झालेली मने सावरायला, विश्वमोहिनी जगदंबा सर्वांपर्यंत पोचवायला गुरूमहाराजांनी आपल्यासारखच व्यक्तिमत्व तयार केले होते त्यात कुठेही फरक नाही. देह दोन पण मन मात्र एक यावेळी पुन्हा एकदा श्री. ज्ञानेश्वराच्या अमृतानुभवातील द्वैतातून अव्दैत दाखविणारी काव्यमय ओवीचे स्मरण होते.

दोन टिपऱ्या पण ध्वनी एक फुले दोन पण सुवास एक
दिवे अनेक पण प्रकाश मात्र एक दोन डोळे पण दृष्टी एक
दोन ओठ पण शब्द एक

या प्रमाणे गुरूस्वरूपच झालेले प.पू. दत्तमहाराज सर्वांच्याच भाग्याने आपल्याला मिळाले. प.पू.दत्तमहाराजांनी पवित्र प्रेमळ अनासक्त वृत्तीने वासुदेव निवासचा पसारा सांभाळला. अखंड प्रवास करून खेडोपाडी ही ज्ञान गंगा पोचविली. प.पू. दत्त महाराजांच्या रूपाने तेच गुरूमहाराजांचे पवित्र जीवन आम्हापुढे उभे आहे. यात तिळमात्र संदेह नसल्याने आमच्यासारख्यांना गुरू महाराज दत्त महाराजांच्या रूपाने आहेतच याची खात्री पटली व जीवनात फार मोठा मंगल आधार मिळाला.

प.पू. दत्त महाराजांना कितीतरी वर्षे आम्ही पहात आहोत. सायकल वरून येणारे प.पू. दत्तमहाराज आज ही डोळ्यासमोर येतात. गुरूमहाराजांपुढे कधिही न बसणारे दत्तमहाराज, कुठल्याही छोट्या मोठ्या समारंभाचे नेतृत्व करणारे प.पू. दत्तमहाराज, कसलाही शुभ संकल्प समग्र सांगणारे दत्तमहाराज, प.पू. गुरूमहाराजांनी सांगितलेले पठण पारायण करणारे दत्तमहाराज, गुरू महाराजांनी सहस्त्रदर्शन रौद्रीशांतीत संपूर्ण पुढाकार असलेले दत्तमहाराज, आश्रम आपणासाठी कसा आवश्यक आहे हे गुरू महाराजांना पटविणारे दत्तमहाराज, "दत्तमहाराज संकल्प हा सत्य संकल्प आहे", असे गुरूमहाराजांच्या मुखातुन गौरवीत झालेले दत्तमहाराज अशा प.पू. दत्त महाराजांची अनेक पैलु दाखविणारी स्मृतीचित्रे डोळ्यासमोर आहेतच.

सात पिढ्यांचा आत्मज्ञानाचा वारसा वंशपरंपरेनेही श्री दत्तमहाराजांकडे आला आहे. प.पू. गुरूमहाराज ब्रह्मचारी तर दत्त महाराज गृहस्थाश्रमी. नाथांसारखा अनासक्त वृत्तीने चालणारा संसार व यातूनच प.पू. गुरू महाराजांप्रमाणे आत्मज्ञानाचे शिखर गाठणारे प.पू. दत्त महाराज हे गुरूमहाराजांच्या विचार धारेचे चालते बोलते प्रतिक आहे. प.पू. गुरूमहाराजांच्या निरोगी अध्यात्म्याचा आदर्श प.पू. दत्त महाराजांच्या रूपाने आपल्यापुढे सतत ठेवला आहे.

या जगात उत्तम तऱ्हेने राहून प्रयत्नाने आपले जीवन सुधारता येते पण ईश्वराचे अधिष्ठान त्यामागे आहे हे सतत लक्षात ठेवून वागावे असे सांगणारे थोर द्रष्टे आहेत. प.पू. गुरूमहाराजांप्रमाणे श्री. दत्त महाराजही संस्कृतिचा मूळ प्रेरक स्त्रोत तेवता ठेवण्याचा व सामान्य जनमानसाला विचारवंत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. हेच या शक्तिपात विद्येचे एकूण रहस्य आहे.

जीवनातील दुःखावर या दोन्ही गुरूशिष्यांनी भर दिला नाही. जीवनाविषयी औदासिन्य जनमानसांत खोलवर रूजले की जीवन हताश होते. जीवनाकडे निराशेने बघण्याचा दृष्टीकोन प.पू. महाराजांनी दत्तमहाराजांनी पुसून टाकण्याचा प्रयत्न केला. संकटावर मात करण्याची उभारी सामान्य माणसाला दिली.

उद्योग करा साधनरत राहून अभ्यास करा, प्रयत्न करा, नुसते आमच्याजवळ बसून काही होणार नाही. ही जीवनाची सुरक्षित बाजू दोघांनीही दाखविली. तुम्हांला तुमचे जीवन सुधारता आले नाही तर तुम्ही परमार्थ तरी कसा करणार. हे सतत आपल्या वाणीतून दोघांनीही सांगितले. यश येईपर्यंत प्रयत्न करा. असे गुरूमहाराज नेहमी म्हणत. प.पू. दत्तमहाराज व गुरूमहाराज यांच्याविषयी विचार करताना श्री निवृत्तीनाथ व श्री ज्ञानेश्वर यांची जोडी लक्षात येते. श्री निवृत्तीनाथ हे फार बोलले नाहीत पण त्यांनी श्री ज्ञानदेवांकडून मात्र गीतेवर भाष्य करून घेतले. जे काही बोलले ते श्री ज्ञानदेवांचे मुखातून. गुरूमहाराजांनी प्रवचने कधी केली नाहीत किंवा कोणतेही व्याख्यान दिले नाही. ते सर्व काम त्यांनी प.पू. दत्तमहाराजांकडे सोपविले होते व आहे.

*नमू शारदा मूळ चत्वारी वाचा*
*गमू पंथ आनंत या राघवाचा*

या श्री समर्थ रामदासांच्या श्लोकाप्रमाणे प.पू. दत्त महाराज शक्तीसहीत शारदेच्या सहाय्याने सर्वांना या अध्यात्म मार्गाकडे वळवीत आहेत. या अनुभूती पूर्ण शब्दांचे महत्व ज्ञानेश्वरांनी आपल्या अमृतानुभवात लिहिले आहे.

*वडिला अव्यक्ताचिया वंशा । उद्योतकारू सूर्य जैसा ।*
*येणे एके गुणे आकाशा अंबरत्व ॥३॥६*

अव्यक्ताच्या वंशात (मायेच्या) शब्द हा सूर्यासारखा प्रकाशक व कुलदीपक आहे जन्माला आहे.

*पाहते आरसा पाहे । येथे काहीच नवल नव्हे*
*परी दर्पणे येणेहोये । न पाहते पाहते .॥*

शब्दांचे महत्व असे की शब्दरूपी आरशात आंधळयाला देखील दिसते म्हणून शब्दांचा आरसा अधिक गुणकारी आहे. असे श्री ज्ञानेश्वर महाराज

म्हणताल. सद्गुरूंना केलेल्या शब्दांच्या श्रवणाने सत् शिष्याला आत्मविचार दृष्टी येते.

आजच्या या ज्ञानाच्या स्फोट झालेल्या जगात शब्दाच्या माध्यमातून निराशायुक्त परमार्थाची व केवळ नशिबावर हवाला ठेवून वागण्याची वृत्ती दूर व्हावी म्हणून शक्तिपाता बरोबरच नेमकी जीवन समाधानाने जगण्याची ज्ञानदृष्टी प.पू. दत्तमहाराज देत आहेत. आज या वयात विरोध पत्करून आपल्या प्रकृतिची चिंता न करता प्रवास करून या ज्ञान गंगेचे वाटप घराघरापर्यंत पोचवीत आहेत. प.पू. दत्त महाराजांच्या शब्दात सांगायचे तर उत्तम ग्राहक बनले पाहिजे तर आपल्या मनात तो बोध रूजेल.

शुध्द अंतःकरणातून निघालेले शब्द मनावर फार परिणाम करतात, खोल जातात असा अनुभव आहे म्हणूनच पावले पुण्याकडे वळतात. त्यांच्या सहवासात मोलाचे चार शब्द ऐकण्यास जीव आतुर असतो. ती बोधवचने हृदयात साठ्वून पुन्हा घरी परतून अभ्यासास लागायचे असते. हा दुर्मिळ संत सहवास आपल्याला लाभत आहे. त्यामुळे चित्तशुध्दी होऊन जीवन भक्तीमय ज्ञानग्राहक व्हावे असे वाटत असते.

मुलानातवंडांनी भरलेले रेणुकासदन व त्यांत सौ. आई साहेबांचे साधे भोळे प्रेमळ व्यक्तिमत्व त्यांच्या उल्लेखाशिवाय प.पू. दत्तमहाराजांचे चरित्र पूर्ण होणार नाही. इतक्या थोर विभूतिचे पत्निपद लाभले हे भाग्याचे असले तरी कठीण आहे. कितीवेळा तरी त्यांना आपल्या मनाला मुरड घालावी लागली असेल. येणाऱ्या अनेक लोकांची उठबस करावी लागली असेल. त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांच्या लोंढयांमुळे व्यक्तिगत जीवनाची कुचंबणा झाली असेल. संसारात लक्ष घालण्यास त्यांना सवड नसल्यामुळे संसारात भार खूप पेलावा लागला असेल. पण तरी ही त्या नेहमी आनंदी असतात. त्यांची वृत्ती विनोदी आहे. त्यामुळे त्या इतरांना खूप हसवतात. सौ. आईसाहेबांना वंदन करण्यातही फार समाधान व आनंद वाटतो.

प.पू. दत्तमहाराजांच्या या संसारवृक्षाखाली श्रांत जीवांना सावली मिळत आहे, जीवनाला आधार मिळत आहे. परमेश्वराकडे स्वतःच्या अनुभवामुळे जाण्याचा मार्ग मिळत आहे. म्हणून आजच्या गुरुमहाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी एकच प्रार्थना की त्यांना उत्तम दीर्घ आयुरारोग्याचा लाभ होवो व आमच्या सर्व लोकांच्या हातून त्यांच्या सांगण्याप्रमाणे कृती घडो.

**सौ. नीला जोशी**

# एक थोर साक्षात्कारी संत

परमपुजनीय श्री दत्तमहाराज कवीश्वर यांना मी प्रथम पाहिले ते मी नवव्या इयत्तेत शिकत असताना. इ.स.१९५३ साली त्यावेळी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ संस्कृत विषयातील दोन परीक्षा घेत असे. संस्कृत वाङ्मयाबद्दल कुतुहल असल्यामुळे मी संस्कृत शिकायचे व या दोन परीक्षांना बसायचे ठरवले. घराजवळच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इमारतीत या परीक्षांसाठी संस्कृत शिकविण्याचे वर्ग चालत. मी या वर्गात नांव घातले. पहिल्याच दिवशी श्री. कवीश्वर नांवाचे गुरुजी आम्हांला शिकवायला आले. फार सोप्या पद्धतीने त्यांनी शिकविले आणि आम्ही विद्यार्थी मोहून गेलो. कानांवर आले की श्री कवीश्वर गुरुजी फार मोठे संस्कृत पंडित आहेत. वेदांत, न्याय व इतर शास्त्रांचा त्यांचा गाढा व्यासंग आहे. पण वर्गात ते छान व सोपे शिकवीत. आम्हाला त्यांच्यामुळे संस्कृतची गोडी लागली पण लक्षांत राहिले ते त्यांचे प्रेम. आम्हां विद्यार्थ्यांवर ते नितांत प्रेम करीत. या प्रेमांत निरपेक्ष ईश्वरी अंश आहे असे जाणवे. तसेच एवढे मोठे संस्कृत शास्त्री व पंडीत असूनही त्यांचा निरहंकारीपणा जाणवे. ते फार साधे रहात, साधे वागत. विनयशील दिसत. स्वतःच्या विद्वत्तेची व सखोल ज्ञानाची जाणीवही न करुन देता आम्हां संस्कृतच्या प्रारंभिक अभ्यास करणांऱ्यांनी समजेल असे सोपे ते शिकवीत. त्यांचा अध्यात्मिक अधिकार ओळखण्याचे माझे ते वय नव्हते.

दोन वर्षे मी वर्गांना जात होतो. विद्यापीठाच्या संस्कृतच्या दोनही परीक्षांत मी चांगल्या रितीने उत्तीर्ण झालो व श्री कवीश्वर गुरुजींना वारंवार भेटता येईनासे झाले. मला वाटते टिळक विद्यापीठाच्या इमारतीतच ते रहात असावेत. त्यामुळे ते येता जाता अनेक वेळा दिसत. दिसले की थांबवून ते चौकशी करीत. त्यांच्या त्या निरपेक्ष प्रेमामुळे आम्हांलाही ते भेटावेसे वाटत. एस. एस.सी झाल्यावर मी कॉमर्स कॉलिजांत नांव घातले. संस्कृतचा अभ्यास तसाच राहून गेला. परंतु श्री कवीश्वर गुरुजी स्मरणांतून गेले नाहीत.

भेटी होईनाशा झाल्या तरी त्यांच्याबद्दल ऐकायला मिळे. त्यांचे वारंवार भागवत सप्ताह होत आसत. श्री वासुदेवानंद यांचे शिष्य श्री दीक्षित स्वामींनी वाडी येथे त्यांना भागवताची प्रत प्रसाद म्हणून दिली व भागवत सप्ताह करायला सांगितले होते. प. पू. श्री दत्तमहाराजांनी अक्षरशः शेकडो भागवत सप्ताह केले. त्यांच्या सप्ताहाला खूप गर्दी होत असे. हे ऐकून होतो. पुढे प.पू. श्री दत्तमहाराजांना भारताच्या राष्ट्रपतींनी विद्यावाचस्पती ही पदवी दिली तेव्हा आम्हांला वाटले की यामुळे पदवीचाच गौरव झाला आहे. तसेच चारही पीठांच्या शंकराचार्यांनी प.पू. श्री दत्तमहाराजांना महावस्त्र व सन्मानपत्र देऊन

गौरवल्याच्या वार्ता वृत्तपत्रांतून वाचायला मिळाल्या त्यावेळीही आनंद वाटला होता.

१९७० साली माझ्या विवाहप्रसंगाला प. पू. श्री दत्तमहाराज उपस्थित राहिले व त्यांनी मला व माझ्या पत्नीला आशिर्वाद दिले. माझे सासरे श्री पारकशास्त्री यांचे ते गुरु. त्यामुळेच हा महायोग जुळून आला. बऱ्याच वर्षांनंतर प.पू. श्री दत्तमहाराजांना पाहिले होते पण असे वाटले की, प.पू. श्री दत्त महाराज जसे होते तसेच अनाग्रही, अनासक्त व विनयशील आहेत. जसे होते तसेच निरहंकारी व निरासक्त आहेत.

त्यानंतर मी मधून मधून प.पू. श्री दत्तमहाराजांच्या दर्शनाला वासुदेवनिवास येथे जाते असे. पण त्यांत नियमितपणा नव्हता. असाच एका दर्शनाच्या वेळी एक परिचित वृद्ध बाई तेथे भेटल्या. त्यांनी मला थांबवले व त्या म्हणाल्या "महाराजांच्या दर्शनाला अवश्य येत जा. त्यांच्या दर्शनाने फारफार शांती मिळते. संसारात अडचणी व आपत्ती असायच्याच. पण माझा माझा अनुभव सांगते. महाराजांचे दर्शन घेतले की सारे सारे विसरायला होते. प्रपंच मागे राहतो. मनाला आगळी शांती व समाधान लाभते."

इ.स. १९८३ साली मी मुंबईला वेलींगकर इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च या संस्थेच्या संचालकपदाची सूत्रे घेतली नि पहिल्याच महिन्यांत संस्थेचे लेखापरीक्षक श्री प.वा. मनोळकर यांची भेट झाली. कसे कोणांस ठाऊक बोलणे वासुदेव निवास व प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्याकडे वळले व श्री मनोळकर यांनी प. पू. श्री दत्तमहाराजांच्या आध्यात्मिक अधिकाराविषयी अनेक प्रसंग सांगितले. प. पू. श्री दत्तमहाराज साक्षात्कारी थोर पुरुष आहेत याची तेव्हा प्रकर्षाने आठवण झाली. त्यानंतर श्री मनोळकर यांच्याकडून प. पू. श्री दत्तमहाराजांबद्दल ऐकायला मिळाले व महाराजांच्या भेटीची ओढ वाढू लागली. पुढे सौ. नीलाताई जोशी यांचा परिचय झाला. त्यांनी माझी अध्यात्ममार्गाकडील ओढ ओळखली व मला प.पू. श्री दत्तमहाराजांच्या भेटीला त्या घेऊन गेल्या मग मी वारंवार प.पू. श्री महाराजांच्या दर्शनाला नियमितपणे जाऊ लागलो. त्यालाही आतां काही वर्षे लोटली. या काळांत प. पू. श्री महाराजांचे अनेक वेळा दर्शन झाले. मनांतील प्रगतीची दिशा आपल्याला मिळाली असे वाटू लागले. जसजसा मी प.पू. श्री दत्तमहाराजांच्या नजीक आलो तसतशी त्यांची आध्यात्मिक योग्यता व अधिकार जाणवू लागला.

एकदां मी प. पू. श्री दत्तमहाराजांनी विचारले, "महाराज साक्षात्कारी पुरुष कसा ओळखावा?" प. पू. श्री. दत्तमहाराज म्हणाले, "साक्षात्कारी पुरुषाची तीन लक्षणे आहेत. तो स्थितप्रज्ञ असतो, भगवतभक्त असतो व गुणातीत असतो." आणि विचार करतां करतां असे लक्षांत आले की ही तीनही लक्षणे प.पू. श्री

महाराजांच्या ठिकाणी प्रकर्षाने दिसून येतात. ज्ञानेश्वरीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञ पुरुषाची लक्षणे सांगितली आहेत. श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात :- स्थितप्रज्ञ पुरुषाच्या चित्तातून विषयसुखाची भावना पूर्णपणे नाहिशी झालेली असते. सुखाची वासना नाहीशी झाल्यामुळे आत्मसुख प्रकट होते. स्थितप्रज्ञ पुरुष आत्मसुखानेच सदैव संतुष्ट असतो. बाहेरुन जरी त्याचा देह विषय भोगताना दिसला तरी स्थितप्रज्ञ पुरुषाचे मन विषयाकार होत नाही. त्याचे चित्त भगवंताच्या ठिकाणी जडलेले असते. त्यामुळे नाना प्रकारची दुःखे प्राप्त झाली तरी त्याच्या मनांत खिन्नता उत्पन्न होत नाही. मनाजोगे झाले नाही अथवा मनाच्या विरुद्ध झाले म्हणून त्याच्या चित्तांत खेद उत्पन्न होत नाही. पूर्ण ब्रह्मबोध झाला असल्यामुळे तो हर्षशोकरहीत असतो. त्याची बुद्धी आत्मस्वरुपाच्या ठिकाणीच स्थिर झालेली असते. त्यामुळे तो सदैव शांत असतो.

प.पू. श्री दत्तमहाराजांना ज्यांनी जवळून पाहिले आहे त्यांना हे जाणवेल की प.पू. श्री महाराजांचे चित्त असेच सदैव आत्मसुखांत तल्लीन झालेले असते. ते सुख व दुःख यांच्या पलिकडे गेलेले आहेत. हर्ष व शोक यां भावनांच्या पलिकडे गेलेले आहेत. सदैव आत्मस्वरुपांतच स्थिर झालेले असल्यामुळे ते सदैव शांत व तृप्त दिसतात. त्यांच्या व्यक्तिगत प्रपंचाची जबाबदारी पेलतांना व श्री वासुदेव निवास या न्यासाचा कार्यभार सांभाळतांना त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. अनेक आपत्ती त्यांच्यापुढे आल्या. पण प.पू. श्री महाराज शांतच राहिले. त्यांची चित्तवृत्ती कधीही ढळली नाही. अशा आत्मस्वरुपी स्थिर झालेल्या पुरुषाला स्थितप्रज्ञच म्हटले पाहिजे. साक्षात्कारी पुरुषाचे हे पहिले लक्षण प.पू. श्री महाराजांच्या ठिकाणी प्रकर्षाने दिसते.

साक्षात्कारी पुरुषाचे हे दूसरे लक्षण म्हणजे तो भगवद्भक्त असतो. श्री ज्ञानेश्वरमहारांजानी बाराव्या अध्यायात भगवद्भक्ताची लक्षणे सांगितली आहेत.

'ज्याप्रमाणे सर्वव्यापी चैतन्याला आप-पर हा भाव नाही, त्याप्रमाणे भगवद्भक्ताला आपला-परका, लहान-मोठा, उत्तम-अधम असा भिन्नपणा नसतो. मी व माझे अशी भावना त्याच्या चित्ताला शिवत नाही. सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी भगवंत दिसतो. तो हृदयात आत्मस्वरुपी ऐक्य साधतो व बाहेर सर्वत्र सर्व नामरुपांच्या ठिकाणी त्याला तेच आत्मस्वरुप भरलेले आहे असा अनुभव येतो. त्यामुळे तो सदैव अखंड ब्रह्मानंदातच असतो. निर्गुण स्वरुपाच्या अनुभवानंतरही तो साकार सगुण भगवंतस्वरुपाची प्रेमभक्ती करीत रहातो. त्यामुळे व्युत्थानकालीही त्याचा ब्रह्मानंद कायम असतो.' प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तीत्वाचीही अशीच स्थिती झालेली आहे हे साऱ्यानांच सारखे वागवतात. सर्वांचे ते कल्याणच चिंतत रहातात. निंदा व स्तुति ते सारखेच मानतात. सगुण परमात्म्याच्या प्रेमभक्तीत त्यांचा मीपणा नाहीसा

झालेला आहे. मीपणा स्फुरतच नसल्यामुळे ते भगवंताशी समरस झालेले आहेत. अशा रितीने श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितलेली भगवद्भक्ताची लक्षणे प.पू. श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी पुरेपुर दिसुन येतात. साक्षात्कारी पुरुषांचे दुसरे लक्षण भगवद्भक्त है प.पू श्रीदत्तमहाराजांच्या अंगी प्रकर्षाने दिसते.

साक्षात्कारी पुरुषाचे तिसरे लक्षण म्हणजे गुणातीत स्वभाव. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी गुणातीत पुरुषाची लक्षणे ज्ञानेश्वरीच्या चौदाव्या अध्यायांत सांगितली आहेत. ते म्हणतात, 'गुणातीत पुरुषाला सर्व चरचरांत परमेश्वरच दिसतो. त्याने देहाचा अभिमान टाकून परब्रह्माशी ऐक्य केलेले असते. आत्मस्वरुपाच्या ठिकाणी स्थिर झाल्यामुळे तो सुखदुःखे सारखीच लेखतो. निंदास्तुती तो सारखीच मानतो. त्याच्या चित्रांत विषमता उत्पन्नच होत नाही. त्याच्या अंतःकरणात कोणतीही इच्छा होत नाही.'

श्री प. पू. दत्तमहाराजहि असेच आहेत. ते सुखदुःख व निंदास्तुति यांच्यापलिकडे गेलेले आहेत. देहाचा अभिमान त्यांच्यात कणभरही राहिलेला नाही. त्यांना चराचरांत परमेश्वरच भरलेला दिसतो. ते आत्मस्वरुपाच्या ठिकाणी स्थिर झालेले आहेत. साक्षात्कारी पुरुषाचे तिसरे लक्षण गुणांतीत स्वभाव हेही प.पू. श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी प्रकर्षाने दिसते.

साक्षात्कारी पुरुषाची तिनही लक्षणे स्थितप्रज्ञ, भगवद्भक्त, व गुणातीत स्वभाव प.पू. श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी प्रकर्षाने दिसतात. म्हणूनच त्यांना आत्मसाक्षात्कार झालेले संत असेच मानले पाहिजे.

ज्ञान, कर्म व भक्ति यांचा त्रिवेणी संगम असा क्वचितच पहायला मिळतो. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन करतांना गीतेतील एक श्लोक आठवतो.

*" अनपेक्षः शुचिर्दक्षः उदासिनो गतंव्यथः ।*
*सर्वारंभ परित्यागी यो मद्भक्तः समे प्रिय ॥"* (१२-१६)

या गीतेतील बाराव्या अध्यायातील श्लोकांत भगवान श्रीकृष्णांनी वर्णन केलेला पुरुष प.पू. श्रीदत्तमहाराजांच्या रुपाने प्रत्यक्ष पहायला मिळतो. त्यांच्या मनांत कोणतीही अपेक्षा निर्माण होत नाही या अर्थाने ते अनपेक्ष आहेत. त्यांच्याइतका अंतर्बाह्य शुचिसंपन्न, पवित्र व दक्ष पुरुष क्वचितच पहायला मिळेल. श्रीवासुदेवनिवास या न्यासाचा प्रचंड पसारा वाढत असतांनाही ते सर्वांना उदासिन किंवा साक्षीभावानेच वावरतांना दिसतात. त्यांच्या वैयक्तिक जीवनांत व वासुदेवनिवास या न्यासाचा कारभार चालवतांना अनेक अडचणी संकटे व आपत्ती त्यांनी अलिप्तपणानेच सोसल्या व ते गतव्यथः असेच राहिले. स्वतःसाठी ते कांहीच करीत नाहीत. सारे भक्तांच्या व भाविकांच्या अध्यात्मिक कल्याणासाठीच या अर्थाने ते सर्वारंभपरित्यागी असेच आहेत.

त्यांच्या अध्यात्मिक अधिकाराची जाणीव होण्यापुर्वी मी साक्षात्कारी पुरुष पहायला मिळावा, यासाठी भारतभर भ्रमण केले. अनेक मठांत व आश्रमांत गेलो. अनेक संतमहंतांची दर्शने घेतली. मनांत वाटत होते. स्थितप्रज्ञ साक्षात्कारी पुरुष ही कविकल्पनाच असेल कां? असा पुरुष प्रत्यक्ष पहायला मिळेल का? पण प. पू. श्रीदत्तमहाराजांना जवळून पाहिले नि मनांतील या शंका मावळून गेल्या. गुणातीत व स्थितप्रज्ञ पुरुष प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या रुपाने प्रत्यक्ष पहायला मिळाला.

प.पू. श्रीमहाराजांचे बालपण जेथे गेले तेथे नरसोबाची वाडी या गांवांत नुकतांच जाण्याचा योग आला. कांही वृद्ध रहिवाश्यांनी सांगितले, 'प.पू.श्रीदत्तमहाराज बालपणापासूनच असे आहेत. बालपणासुद्धा त्यांचे ज्ञान, व त्यांची भक्ती पहाणाऱ्याला स्तिमित करी.' हे ऐकले व श्रीज्ञानेश्वरी या ग्रंथातील एक ओवी आठवली.

*"तैसी दशेची वाट न पहाता ।*
*वयसेचिया गावा न जाता ।*
*बाळपणी सर्वज्ञता ।*
*वरी तयाते ॥"*

प्रौढ दशेची वाट न पहाता, वय मोठे होण्याची वाट न पहाता त्या पुरुषाचे बालपण चालू असतांनाच सर्वज्ञता त्याला माळ घालते. हे श्रीज्ञानेश्वमहाराजांच्या बाबतीत जेवढे खरे आहे. तेवढेच श्रीदत्तमहाराजांच्या बाबतीतही खरे आहे. अनेक जन्मांची भक्तिसाधना, कर्मसाधना व ज्ञानसाधना फळाला येते व प. पु. श्रीदत्तमहाराजांच्या सारखा पुरुष जन्माला येतो.

आमचे भाग्य की हा असा स्थितप्रज्ञ, भगवद्भक्त व गुणातीत पुरुष आमच्या महाराष्ट्रांत वावरतो आहे व अध्यात्मसाधनेची गंगा मुक्तहस्ताने भक्तांना वाटत आहे.

**डॉ. शरदूचंद्र कोपर्डेकर**
संचालक
प्रि. ल.ना.वेलिंगकर इन्स्टिट्युट ऑफ
मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲंड रिसर्च
१९५, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

।। श्री गणेश दत्तगुरुभ्योनमः ॥

# वाटचाल........

हातात रिकामी परडी घेऊन, अनभवाचा रसरसून फुललेला 'वेलु' कुणाच्या दारात फुलला आहे याचा मी शोध घेत होते. शोध अशासाठी की मुंबई विद्यापीठात ज्ञानेश्वरीच्या ६व्या अध्यायावर म्हणजे 'कुंडलिनी योगा' वर मला काही बोलायचे होते. 'कुंडलिनी' हा अनुभवाचा विषय. पुस्तकी पांडित्याचा तिथे काहीच उपयोग नाही, हे मला पुस्तके वाचून चांगले उमगले होते. मी ज्याला त्याला विचारत होते, 'ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा । जिया विश्वबीजाचिया कोंभा । साऊली केली' अशा ह्या शक्तीचा अनुभव खरोखरीच येतो की ही केवळ कविकल्पना आहे ? उत्तरादाखल नकारघंटा वाजवून काहींनी सांगितले, 'हिमालयात जाऊन शोधलंत कर भेटेल कदाचित कुणीतरी?' एकांनी तर चक्क ऐकवले, 'कसला अधुनिक काळात मुर्खासारखा विचार करता? वेड लागेल असले विचार करुन !'

शेवटी विद्यापीठात उपलब्ध सामग्रीच्या सहाय्याने भाषण तर झाले. पण केवळ 'शाब्दिक' पातळीवर परिचयाची झालेली 'शक्ती' मनाला सतत अस्वस्थ करत राहिली. रात्री-अपरात्री खुणावत राहिली.... कधी ताऱ्यांमधून, कधी वाऱ्यामधून तर कधी आकाशीच्या निळ्या रंगामधून हाकारत राहिली....

आणि एक दिवस अचानक माझे पूर्वपुण्य फळाला आले. सौ. नीलाताई जोशींची ह्या मार्गावरची वाटचाल कळली आणि त्यांचे बोट धरुन मी प.पू. दत्तमहाराजांच्या चरणाशी आले.

एके दिवसी संध्याकाळी थोड्या कावऱ्याबावऱ्या वृत्तीने मी वासुदेव-निवासात प्रवेश केला. तळमजल्यावर हवेचा कण आणि कण कापूर, चंदन, उदबत्तीच्या सुगंधाने हलुवार झाला होता. स्वच्छ गार फरशी आणि देव्हाऱ्यातली सुंदर पूजा डोळ्यांना सुखावत होती. महायोगी वासुदेवानंद सरस्वती टेंबेमहाराज आणि लोकनाथतीर्थांच्या भव्य तसबिरी बातावरणाला पावित्र्याचा स्पर्श करत होत्या. योगाभ्यास, चित्रकला, सौंदर्यदृष्टी, प्रेमळपणा - या संदर्भात गुळवणीमहाराजांच्या ऐकलेल्या आठवणी भिंतीवरच्या त्यांच्या फोटोंमुळे मनांत जाग्या होत होत्या. देव्हाऱ्यातला एकमुखी दत्त, दत्तसंप्रदायाचा इतिहास आणि त्याच्या वाटचालीची रुपरेषा दिग्दर्शित करत होता. वैराग्यसंपन्न योगाभ्यासी पुरुषांच्या परंपरेतल्या एका अधिकारी 'विद्यावाचस्पती' असलेल्या सद्गुरुंच्या दर्शनासाठी मी वासुदेवनिवासाच्या पायऱ्या चढत होते.

महाराजांना मी प्रथम बघितले 'वासुदेव निवासात' - पहिल्या मजल्यावर. अनुभव, ज्ञान, भक्ती, वैराग्याचा ८०-८२ वर्षांचा उजळलेला भूतकाळ पाठीशी

घेऊन गादीवर बसलेल्या महाराजांच्या पायावर डोके ठेवून मी वर बघितले. क्षणभरच त्यांच्या दृष्टीला माझी दृष्टी भिडली आणि प्रेमाची गंगा उसळत फेसाळत मला भिजवून गेली. मनात प्रसन्नतेचा मळा बहरला. चित्तवृत्तीचा पारिजात फुलायला लागला...

तरी माझ्या श्रद्धेच्या मळयात शंकांचे निवडुंग उभे होतेच. असंख्य प्रश्नांचे मनांत घोंघावणारे वादळ चित्ताला अस्वस्थ करता होते... शेवटी मी विचारले, "महाराज कुंडलिनीच्या संदर्भात एक प्रश्न मला सतत हैराण करतो आहे की ज्ञानेश्वरांनी वर्णन केलेला हा अनुभव खरच खरा आहे का ?"

महाराजांनी क्षणभर माझ्याकडे बघून सांगितले, "हो, येऊ शकतो हा अनुभव. पण योगमार्ग अवघड आहे. त्यासाठी आधी अंतःकरण शुद्धी व्हावी लागते. मन आणि बुद्धी स्थिर झाल्याशिवाय अनुभर येणार नाही."

लगेच मी विचारले,"मन आणि बुद्धी स्थिर कशी होईल?"

"नामस्मरणानी. सततच्या अभ्यासानी."

'पण महाराज, माझा अभ्यास तर केवळ पुस्तकी आहे. ह्या विषयाचा अनुभव येत नाही म्हणून मग विश्वासही बसत नाही.'

"येईल हळुहळु. अनुभव येतो आणि शाब्दिक पातळीवरची माहितीही उपयोगाची असते. शाब्दिक ज्ञान कमी मानू नये."

महाराजांचे शब्द, त्याचा शांत गंभीर स्वर आणि प्रेमळ मूर्ती हृदयात कोरली गेली. महाराजांविषयी समजले की ते मितभाषी आहेत. स्वतःविषयी तर ते काहीच बोलत नाहीत. झाडावरून पिकलेले फळ जितक्या अलगदपणे गळून जाते तितक्या अलगदपणाने ज्यांचा 'मी' पणा गळून गेला आहे त्यांच्या शब्दकोशात 'माझे', 'मला', 'माझ्या' हे शब्द नसणं स्वाभाविकच नाही का? भक्तीची आणि विद्येची दीर्घ परंपरा लाभलेल्या कवीश्वरांच्या घराण्यात त्यांचा जन्म झाला. प.पू. दिक्षितस्वामी आणि गुळवणीमहाराजांची ज्यांच्यावर सदैव कृपादृष्टी होती, संथ वहाणाऱ्या कृष्णामाईच्या निसर्गरम्य काठावर ज्यांचे बालपण गेले, सौ. आईसाहेबांसारखी सुशील सहधर्मचारिणी ज्यांना लाभली अशा दत्तमहाराजांच्या परिपक्व प्रज्ञेतून उमललेला साधेपणा त्यांच्या भक्तांना विलक्षण प्रिय आहे. महाराज जेव्हा बोलतात तेव्हा शब्दही अतिशय साधे, सोपे वापरतात. पण त्यामागचा अर्थ मात्र गंभीर, ऐकणाऱ्याचा वैचारिक परिघ रुंदावणारा असतो.

एकदा मी त्याना विचारले, 'महाराज, अध्यात्मिक वाचन, चिंतन करूनही मन लौकिकात खूप रमते. त्यासाठी काय करावे.?'

महाराज म्हणाले,"रमू दे की, काही हरकत नाही. एखादे सुंदर चित्र भिंतीवर टांगलेले असते. छान असते. पण आपल्याला भिंतीचा आधार आहे हे चित्राने विसरता कामा नये."

महाराजांची अस्तिपक्षी विचारधारा मानवी अस्तित्वामागे सळसळणाऱ्या चैतन्याशी आठवण किती सहजपणे करुन देते! चित्राला असलेल्या भिंतीच्या आधाराच्या उदाहरणातून रूक्ष तत्वज्ञानही अचूक, नेमक्या-पद्धतीने मांडल्यास सामान्य माणसांच्या हृदयापर्यंत जाऊन कसे पोचते ते ध्यानांत येते. किंबहुना महाराजांच्या अमोघ वक्तृत्वाचे हे वैशिष्ट्यच आहे.

कधी कधी मनांत येते ते निर्गुण, निराकार तत्व जर देहातीत आहे तर ह्या देहात राहून त्याला कसे जाणता येईल ? ते तर इंद्रियांचा विषय नाही आणि आपण अनुभव घेतो तो इंद्रियांच्या सहाय्याने. याविषयी महाराजांना विचारले असता उत्तर मिळाले, 'भक्तीमार्ग किंवा ज्ञानमार्ग हे साधनमार्ग अहेत. हे मानसिक आहेत, यात मनाला फार महत्व आहे. मन विचार करते. इंद्रियाद्वारे शक्ती दाखवली जाते. वाणी, मनाच्या पलिकडे आत्मरुप आहे. विचारांचा किंवा शब्दांचा उपयोग करुन मनाचे दोष कमी करता येतात. आत्मविचार खोटा आहे. हा विचार बदलण्याकरता तरी शब्द हवेत ना! त्यात आधी बाह्यवृत्ती कमी व्हायला हवी. देहाचा विचार कमी झाल्यावरच तत्व कळेल. इंद्रिय बाहेर धावतात. त्यांची धाव थांबल्याखेरीज आत्मस्वरुप उमगणार नाही. आमची भौतिक बुद्धी जे दिसते तेवढेच खरे मानते. ती बुद्धी काढायला हवी. 'चैतन्य' हा इंद्रियांनी न समजणारा पदार्थ आहे. पण आपल्याला समजत नाही म्हणून तो पदार्थच नाही असं नाही. इंद्रियं आहेत पण ती सदोष असू शकतात. दूरचे तारे डोळ्यांना दिसत नाहीत, इथे दूरत्व हा दोष आहे. तेव्हा इंद्रियांनी समजत नाही म्हणून तो नाही असं समजणं अयोग्य आहे. बुद्धीच्या योगेही खरे समजेलच असे नाही. शब्द प्रमाणही महत्वाचे आहे. अधिकारी पुरुषाच्या शब्दांच्या मधे आपली बुद्धी येऊन उपयोगाची नाही. गुरु दिशा दाखवेल पण प्रयत्न स्वतः करावा लागतो. अतींद्रियाचे अस्तित्व मान्य करण्याकरताही पुष्कळ प्रयत्न करावा लागतो. तेव्हा बुद्धी स्थिर होते. योगी, योगशास्त्र खोटे नाही. हे नक्की आहे असा पक्का निश्चय हवा. अनुत्साह नको. मनाची शक्ती वारंवार विचाराने वाढते. मार्गदर्शक असतात पण अभ्यस स्वतः केला पाहिजे. अभ्यासात अडथळे, दृष्ट-अदृष्ट कारणाने प्रतिबंधाने येतात. पण दृढनिश्चय हवा, प्रयत्न हवा. खरे कर्म मानसिक आहे. अहंकार सोडून जे कर्म होते ते खरे कर्म. मनाची स्थिरता, बुद्धीची वृद्धी महत्वाची. सगळे मार्ग मनाच्या योगाने होणारे आहेत. वृत्तींचा निरोध हवा - ही समाधी - मानसिक उन्नती होत होत साधते. समाधीत जास्तीत जास्त मन स्थिर होणे महत्वाचे. धारणा-ध्यान-समाधी ह्या तिन्हींचे ऐक्य होते तेव्हा तो पदार्थ दिसू शकतो.

गंमत अशी की सतत निरनिराळया साधकांच्या तत्वज्ञानात्मक किंवा व्यक्तीगत प्रश्नांना महाराज सारख्याच उत्साहाने उत्तरे देतात. काळाचे माप आपल्या सर्वांच्याच जीवनाला लागलेले आहे हे ओळखूनही त्यांच्या वृत्ती रुक्ष

किंवा कोरड्या झालेल्या नाहीत. आयुष्याचे अर्थशून्यत्व जाणूनही तटस्थपणे, अलिप्तपणे आयुष्याचा प्रत्येक क्षण आनंदाने अनुभवायचा, ही अवघड किमया त्यांना साधली आहे. साध्या साध्या गोष्टीला मिष्किलपणे वळण ते त्यामुळेच देऊ शकतात.

कांही दिवसांपूर्वीची गोष्ट. त्यांना पित्ताचा त्रास होत होता. सौ. नीलाताई आणि मी त्यांच्याकडे गेलो होतो. प्रकृतीच्या अस्वास्थामुळे ते पडून होते. थोड्यावेळाने खोलीचे दार उघडून त्यांनी आम्हाला सर्वांना आत बोलावले. त्यांच्या तब्येतीची चौकशी करताच म्हणाले, "आता ठीक आहे. थोडं पित्त झालं होतं. पित्त हे जावयासारखं असतं, कधी उसळेल त्याचा नेम नाही."

महाराजांचा हा सहजसुंदर विनोद वातावरणातली उदासिनता दूर करून गेला.

त्यांच्यासारख्या योगी, परिणतप्रज्ञ अधिकारसंपन्न व्यक्ती विषयी मी काय लिहावे? जेव्हा जेव्हा मी त्यांच्याकडे जाते तेव्हा माझा रिकामा पदर विचारधनांनी ते ओसंडून टाकतात. मृत्यू म्हणजे काय? जगात देव आहे का? माणसाचा जन्म ही केवळ जीवशास्त्रीय घटना आहे का? ध्यान कसे करावे ? अशा अनेक प्रश्नांची त्यांनी केलेली उकल ऐकतच रहावी. त्यांचा विशेष असा की ही उकल शास्त्राद्वारे होत असते, आणि अनुभवाच्या अंगानेही होत असते. साधारणपणे अध्यात्ममार्गी माणसे आधुनिक जगाला आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाला पारखी असतात. असा एक गैरसमज आहे. श्री प.पू. दत्तमहाराजांना आजच्या राजकीय, सामाजिक, विज्ञाननिष्ठ जगाचे सखोल भान आहे. ते सतत प्रवास करतात. त्यामुळे बाह्य स्थित्यंतराविषयी असणारी सभानता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक विशेष आहे.

सत्पुरुष स्वतःच्या कृतीचा आदर्श लोकांपुढे निर्माण करत असतात. महाराजांना भेटायला येणाऱ्या माणसांत सर्वच समानधर्मी नसतात. विरुध्द विचारांना सामोरे जातांनाही त्यांच्या चित्रवृत्ती आंदोलत तर नाहीतच उलट समृद्ध परंपरेने दिलेली बळकट जीवनश्रद्धा आणि चैतन्याच्या संदर्भातला अस्तिपक्षी दृष्टीकोन विलक्षण शांतपणाने ते मांडतात. मानसिक खळबळीचे, वैचारिक संघर्षाचे प्रसंग आपल्याप्रमाणे त्यांच्याही आयुष्यात येतात. पण सामान्य माणूस कोलमडून जाईल अशा प्रसंगात ते एखाद्या भक्कम कणखर वृक्षाप्रमाणे कसे अविचलीत मनाने उभे रहातात. हे महाराजांच्या चरित्रातील काही प्रसंग लक्षात आणून देतात. केवळ स्वतःपुरते न जगणाऱ्या आणि 'हे विश्वचि माझे घर' अशा विशाल मनोवृत्तीने जगात विहार करणाऱ्या अशा व्यक्तींच्या साध्या साध्या कृतीतूनही आपल्याला जीवन जगायला बळ लाभत असते. 'ईश्वरी शक्तीवर श्रद्धा ठेवावी. साधना नियमाने करावी. विकाराच्या आधीन होऊ नये. सारखी

कशाचीही खंत करु नये, दुसऱ्याचे दोष न बघता स्वतःला सुधारण्याचा प्रयत्न करावा. सत्कर्मात मन रमवावे' ह्यासारखा त्यांचा उपदेश माणसालो अंतर्मुख करतो.

ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायाच्या सुरवातीला गुरुकृपादृष्टीचा जयजयकार करतांना ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.

*'जय जय शुद्धे । उदारे प्रसिद्धे ।*
*अनवरत आनंदे । वर्षीतिये ।।L.*
*योगसुखाचे सोहळे । सेवकां तुझेनि स्नेहाळे ।*
*सोऽहंसिद्धीचे लळे । पाळीसी तू ।।'*

तीच भावना मनात वागवून मी महाराजांच्या चरणी प्रार्थना करते, की अनुभवाच्या ह्या फुललेल्या वेलीची चार फुले माझ्याही परडीत पडावी.

- डॉ. माधुरी पणशीकर

ॐ